गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

✻ वर्ष ६५ वे ✻ अंक २९० ✻ नांदेड ✻ शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६ ✻ पृष्ठे ६ ✻ किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

विधानपरिषदेच्या निकालानंतर महायुतीतील वाद वाढवू नका!

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे शिवसेना नेत्यांना आदेश

मुंबई (प्रतिनिधी)– विधान परिषद निवडणुकीच्या निकालांनंतर महायुतीतील घटक पक्षांमध्ये आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात असून वाद पेटला आहे. या वाढत्या राजकीय वादाची गंभीर दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना नेते, प्रवक्ते आणि पदाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. विधान परिषद निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीत निर्माण झालेला विसंवाद अजिबात वाढवू नका, असे स्पष्ट निर्देश एकनाथ शिंदे यांनी पार पडलेल्या पक्षाच्या महत्त्वाच्या बैठकीत दिले आहेत.

या निवडणुकीतील निकालांचे महायुती म्हणून सर्वांनी मिळून आत्मपरीक्षण करणे गरजेचे असून झालेल्या चुकांची पुनरावृत्ती टाळावी, असे सांगत महायुतीत वितुष्ट निर्माण होणार नाही आणि अंतर्गत वादाचा फायदा विरोधकांना मिळणार नाही, याची खबरदारी घेण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.

एकनाथ शिंदे यांनी महायुती म्हणून काम करताना नक्की कुठे चुका आणि त्रुटी राहिल्या, याचा सविस्तर अहवाल स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून मागवला आहे. लवकरच होणाऱ्या महायुती समन्वय समिती आणि सर्व वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत या अहवालावर आणि सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली जाणार आहे.

तसेच, तूर्तास शिवसेनेच्या कोणत्याही प्रवक्त्याने किंवा पदाधिकाऱ्याने माध्यमांसमोर जाऊन मित्रपक्षांवर कोणतीही जाहीर टीका करू नये, अशा कडक सूचना देऊन विसंवाद टाळून एकजुटीने पुन्हा कामाला लागण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत.

राज्यात विधानपरिषद निवडणुकीतील सर्वाधिक गाजलेली आणि प्रतिष्ठेची मानली जाणारी जागा म्हणजे पुणे पदवीधर मतदारसंघ! या जागेवर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार आणि माजी सनदी अधिकारी प्रभाकर देशमुख यांच्या कन्या हर्षदा यांनी दणदणीत विजय मिळवला. त्यांनी भाजपच्या उमेदवार स्मिता जाधव यांचा ९,९२८ मतांनी पराभव केला.

भाजपने सलग तीन वेळा ही जागा जिंकली होती. विद्यमान आमदार महायुतीत असतानाही भाजपचा येथे पराभव झाल्याने भाजप नेत्यांनी थेट शिवसेनेला लक्ष्य करण्यास सुरुवात केली. दोन्ही पक्षांच्या स्थानिक नेत्यांकडून एकमेकांवर सुरू झालेल्या चिखलफेकीमुळे महायुतीत कमालीचा तणाव निर्माण झाला आहे. त्यावर आता एकनाथ शिंदेंनी मध्यस्थी करत पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे.

दुष्काळग्रस्त भागासाठी सरकारची चारा खरेदी

मुंबई (प्रतिनिधी)– राज्य सरकारकडून दुष्काग्रस्त भागातील पशुधनासाठी चारा खरेदी करण्यात येणार आहे. या चारा खरेदीचा दर सरकारने निश्चित केला असून सुका चारा आणि मुरघास यांच्या खरेदीसाठी अनुक्रमे प्रतिकिलो कमाल १२ रुपये आणि ८ रुपये अशी आधारभूत किंमत निश्चित करण्यात आली आहे. या दरांमध्ये वाहतूक खर्चाचा समावेश नसून तो स्वतंत्रपणे देण्यात येणार आहे. सन २०२६–२७ मधील दुष्काळाच्या कालावधीसाठी हे दर लागू राहणार आहेत.

राज्यातील ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर चारा टंचाईवर मात करण्यासाठी पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाने चारा खरेदीविषयी शासन निर्णय जारी केला आहे. या भागातील शेतकऱ्यांच्या पशुधनासाठी शासनाने चारा खरेदी करताना गुणवत्तेचे निकषही निश्चित केले आहेत. सुक्या चाऱ्यातील ओलाव्याचे प्रमाण कमाल १५ टक्के असावे. चारा चांगल्या दर्जाचा, आंबट किंवा कुबट वास नसलेला तसेच बुरशी, माती आणि किडींपासून मुक्त असणे आवश्यक आहे.

बद्रीनाथहून परतणारे हेलिकॉप्टर जोशीमठाजवळ कोसळले, चार जणांचा मृत्यू तर दोन जखमी

चमोली (प्रतिनिधी)– उत्तराखंडच्या चमोली जिल्ह्यामध्ये बद्रीनाथ– डेहराडून दरम्यान धावणाऱ्या एका हॅलिकॉप्टरचा अपघात झाल्याची घटना घडली आहे. बद्रीनाथ धामवरून प्रवाशांना घेऊना जाणारे हॅलिकॉप्टर कोसळल्याची घटना घडली आहे. या भीषण अपघातामध्ये सहा जखमी झालेल्यांपैकी चार जणांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. दोन जण गंभीर जखमी आहेत.

हॅलिकॉप्टर कोसळल्याची दुर्घटना बद्रीनाथ आणि ज्योतीर्मठ दरम्यान झाल्याचे वृत्त आहे. ट्रान्स भारत कंपनीच्या असलेल्या या हेलिकॉप्टरमध्ये एक पायलट आणि पाच प्रवासी असे सहा जण होते. सर्व प्रवासी बंगळूरचे रहिवासी असल्याचे सांगितले जात आहे. हेलिकॉप्टर बद्रीनाथहून डेहराडूनला जात होते आणि सहस्रधारा हेलिपॅडवर उतरणार होते. हेलिकॉप्टर खडकावर आदळून कोसळल्याची शक्यता वर्तवली जात आहे. परंतु अद्याप नेमक्या कोणत्या कारणामुळे, हॅलिकॉप्टर कोसळले? ही माहिती समोर आली नाही. एसडीआरएफ, इतर पथकांसह आणि लष्कर पथक सुद्धा बचाव कार्यात आणि मदतकार्यात व्यग्र आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून, ट्रान्स भारत एव्हिएशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या सर्व हेलिकॉप्टर्सचे सुद्धा उड्डाण रद्द करण्यात आले आहेत.

पायलटसोबत संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू असून घटनास्थळी आणखी एक पथक पाठवण्यात आले असल्याची माहिती उत्तराखंड नागरी विमान वाहतूक विकास प्राधिकरणाचे सीईओ प्रतीक जैन यांनी दिली. कॅप्टन हिमांशु (पायलट) आणि प्रथापा, अरुण, शंकर गौडा, सुधीर के आणि एसएस नटराजा (प्रवासी) असे सहा प्रवासी हॅलिकॉप्टरमध्ये होते. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत अपघाताविषयी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, जोशीमठ येथील चाई गावाजवळ हेलिकॉप्टर कोसळल्याची दुर्दैवी बातमी मिळाली. जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि एसडीआरएफ हे तिन्ही पथक बचावकार्य एकत्रित रित्या करत आहेत. मी सुद्धा या संपूर्ण घटनेवर सतत लक्ष ठेवून आहे. मी गंभीर जखमींना पुढील उपचारांसाठी तातडीने रुग्णालयामध्ये दाखल करण्याचे निर्देश देत असून रुग्णांना एअरलिफ्ट करून रुग्णालयात दाखल करण्याचे निर्देश देत आहे. मी जखमींच्या उत्तम आरोग्यासाठी देवाकडे प्रार्थना करतो.

आ.संजय गायकवाड यांच्यावर पक्षांतर्गत कारवाईचे संकेत

मुंबई (प्रतिनिधी)– शिवसेनेचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी अलीकडेच केलेल्या शेतकऱ्यांबाबतच्या वादग्रस्त वक्तव्याने नव्या वादाला तोंड फुटलं आहे. एकीकडे संजय गायकवाडांच्या वक्तव्यानंतर विरोधकांकडून टीकेची झोड उठली असतानाच आता पक्षानेही संजय गायकवाडांविरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. 'आत्महत्या करून जीवन संपवणाऱ्या शेतकऱ्यांच्या अंत्यसंस्कारालाही कुणी जाऊ नये' असं वक्तव्य करणाऱ्या आ.संजय गायकवाड यांच्यावर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सुद्धा प्रचंड संतापल्याची माहिती आहे. परिणामी त्यांच्यावर आता निलंबनाची कारवाई होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्या वाडी उपजिल्हा रुग्णालयाचे लोकार्पण

शिवसेना आमदारांची पत्रकार परिषदेत माहिती

नांदेड (प्रतिनिधी)– नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील वाडी (बु.) येथे नव्याने उभारण्यात आलेल्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे उद्या, रविवार, दि. १ नोव्हेंबर रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण होणार आहे.

या कार्यक्रमात विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन करण्यासोबतच दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना चारा, विधवा महिलांना शिलाई मशीन आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील गरजू विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात येणार आहे, अशी माहिती ना. हेमंत पाटील आणि नांदेड उत्तरचे आ. बालाजीराव कल्याणकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला शिवसेनेचे नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख रमाकांत मढवी, आमदार आनंदराव बोंढारकर, आमदार बाबुराव कोहळीकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, उमेश मुंडे, विनय गिरडे पाटील आणि विवेक देशमुख यांच्यासह शिवसेनेचे आजी– माजी लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर राहणार असून, सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे, खासदार अशोकराव चव्हाण, राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे, (पान ५ वर...)

आ. कल्याणकरांमुळेच रुग्णालय साकारले –ना. हेमंत पाटील

यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना नामदार हेमंत पाटील म्हणाले की, वाडी (बु.) येथे उभारण्यात येत असलेले १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय केवळ आमदार बालाजी कल्याणकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे साकार झाले आहे. या रुग्णालयाचा लाभ नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील हजारो रुग्णांना होणार असून, परिसरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

एकाच दिवसात १६ सराईत गुन्हेगार जिल्ह्यातून तडीपार

- मटका, जबरी चोरी, खुनाच्या गुन्ह्यातील गुंड
- पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांची कारवाई

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात मटका, जबरी चोरी व खुनाच्या गुन्ह्यातील १६ सराईत गुन्हेगारांना जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी एकाच दिवसात केली आहे.

शहर व परिसरात शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि सामान्य नागरिक, व्यापारी व महिलांमध्ये सुरक्षिततेचे वातावरण निर्माण व्हावे, यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाने गुन्हेगारी प्रवृत्तींविरुद्ध कडक प्रतिबंधात्मक मोहीम हाती घेतली आहे. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात '२+ स्कीम' (दोन किंवा त्यापेक्षा अधिक गंभीर गुन्हे दाखल असलेल्या सराईत गुन्हेगारांची स्वतंत्र यादी) प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

या अंतर्गत सामान्य नागरिकांच्या जीवितास व मालमत्तेस धोका निर्माण करणाऱ्या, दहशत पसरवणाऱ्या तसेच अवैध धंदे, मटका– जुगार, जबरी चोरी, दरोडा, मोटारसायकल चोरी, अवैध शस्त्र बाळगणे व खुनासारखे गंभीर गुन्हे करणाऱ्या सराईत टोळ्यांविरुद्ध कठोर पाऊल उचलण्यात आले आहे.

डॉ. निलाभ रोहन यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५५ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दि. २८ आक्टोबर रोजी ५ वेगवेगळ्या प्रस्तावांमध्ये एकूण १६ सराईत गुन्हेगारांना नांदेड जिल्ह्यातून १ ते २ वर्षांसाठी हद्दपार (तडीपार) करण्याचे अंतिम आदेश पारित केले आहेत.

पोलीस ठाणेनिहाय कारवाईचा तपशील

पोलीस ठाणे भाग्यनगर – ६ गुन्हेगारांना १ वर्षासाठी हद्दपार : टोळी सदस्य: नितूल विनोद चव्हाण (वय ३९, निळा रोड), ऋषिकेश उर्फ वेणू अरुण कांबळे (वय ३२, सिद्धार्थनगर), शेख इस्माईल शेख मुनीर (वय ३३, आसरानगर), अन्वर अल्ली खान अकबर अल्ली खान (वय ३५, खडकपुरा), धम्मदीप संभाजी थोरात (वय ३४, प्रभातनगर), मन्मथ पिल्लया स्वामी (वय ३२, वैभवनगर) यांच्यावर सन २०२१ ते २०२६ दरम्यान अवैध मटका– जुगार यांसारखे एकूण ८ गुन्हे.

पोलीस ठाणे भाग्यनगर – २ गुन्हेगारांना १ वर्षासाठी हद्दपार : टोळी सदस्य: अक्षय केशव पांढरे (वय २१, पालीनगर), विशाल सिद्धार्थ गायकवाड (वय २२, शंकरनगर) यांच्यावर सन २०२५– २६ मध्ये जबरी चोरी व अवैध शस्त्र बाळगणे असे २ गंभीर गुन्हे.

पोलीस ठाणे विमानतळ – ३ गुन्हेगारांना २ वर्षांसाठी हद्दपार : टोळी सदस्य: विश्वास परमेश्वर शिंदे (वय २३, तथागतनगर), महेश बालाजी मुंडे (वय २२, शिवनगर), सय्यद इम्रान सय्यद चांद (वय २२, शिवनगर) यांच्यावर सन २०२० ते २०२६ दरम्यान मोटारसायकल चोरी, जबरी चोरी, खुनाचा प्रयत्न, शस्त्र अधिनियम असे एकूण १२ गंभीर गुन्हे.

पोलीस ठाणे इतवारा – २ गुन्हेगारांना १ वर्षासाठी हद्दपार : टोळी सदस्य: मुकेश उर्फ एमके चंदन जोगदंड (वय २४, संघसेननगर), शेख मोबीन शेख गौस (वय २३, खुदबेनगर) यांच्यावर सन २०२३– २४ मध्ये दरोडा, जबरी चोरी व अवैध शस्त्र बाळगणे असे ३ गुन्हे.

पोलीस ठाणे अर्धापूर – ३ गुन्हेगारांना १ वर्षासाठी हद्दपार : टोळी सदस्य: दिगांबर अशोकराव मकरे (वय २९), यशराज लक्ष्मण तुंगेवाड (वय २१), परमेश्वर गोविंद शिंदे (वय २०) सर्व रा. लहान, ता. अर्धापूर यांच्यावर सन २०२६ मध्ये जबरी चोरी व धमकावणे असे २ गुन्हे दाखल आहेत.

पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शांतता, सुव्यवस्था आणि नागरिकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर प्रतिबंधात्मक कारवाई सुरूच राहील.

नांदेड : महाराष्ट्र–गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष ॲड. राजेंद्र उमाप हे बार कौन्सिलच्या निवडणुकीत पुन्हा प्रचंड मताधिक्याने विजयी झाल्याबद्दल दैनिक गोदातीर समाचार कार्यालयात संपादक केशव घोणसे पाटील यांनी त्यांचा सत्कार केला. याप्रसंगीच्या छायाचित्रात पुणे बार कौन्सिलचे ॲड. कांताराम नप्ते पाटील, ॲड. रोहित पोटावळे, ॲड. अशोक उमाप, दीपक पुयड, आशुतोष घोणसे पाटील हे दिसत आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे रविवारी नांदेड दौऱ्यावर

नांदेड (प्रतिनिधी)– राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

रविवारी दुपारी १ वाजता मुंबई विमानतळ येथून विमानाने नांदेडकडे प्रयाण होईल. दुपारी १.४५ वाजता नांदेड विमानतळावर आगमन झाल्यानंतर ते मोटारीने वाडी (बु.) येथे प्रयाण करतील. दुपारी २ वाजता उपजिल्हा रुग्णालय, वाडी (बु.) येथे आयोजित नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांच्या लोकार्पण व उद्घाटन सोहळ्यास ते उपस्थित राहतील.

या कार्यक्रमात नवनिर्मित १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या मुख्य इमारतीचे लोकार्पण, जिल्ह्यातील विविध रस्त्यांचे लोकार्पण करण्यात येणार आहे. तसेच दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पशुधनासाठी चारा वाटप, दुष्काळग्रस्त भागात टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचा शुभारंभ, गरजू महिलांना शिलाई यंत्रांचे आणि विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात येणार आहे. सायंकाळी ४ वाजता मोटारीने नांदेड विमानतळाकडे प्रयाण करतील.



वाडी बु. येथील रूग्णालयास पद्मश्री शामराव कदम यांचे नाव देण्यासाठी सर्वपक्षीय बैठक संपन्न

'आ. चिखलीकर यांनी पुढाकार घ्यावा' तर आ. कल्याणकर यांनी प्रश्न मार्गी लावावा

नांदेड (प्रतिनिधी)– नांदेड शहरालगत असलेल्या वाडी बु. येथे नव्याने उभारण्यात आलेल्या शंभर खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयास पद्मश्री शामरावजी कदम यांचे नाव देण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी सर्व पक्षीय नेते मंडळींची बैठक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शुक्रवारी संपन्न झाली.

सर्वच पक्षाच्या नेते मंडळींनी वाडी येथील रूग्णालयास पद्मश्रींचे नाव द्यावे, अशी एकमुखी मागणी केली. तसेच आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी यात पुढाकार घ्यावा, तर आ. बालाजीराव कल्याणकर यांनी हा प्रश्न मार्गी लावावा, असे मत बैठकीत व्यक्त करण्यात आले.

या आयोजित केलेल्या बैठकीला आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, खा. नागेश पाटील आष्टीकर, माजी मंत्री माधवराव पाटील किन्हाळकर, माजी आ. हनमंत पाटील बेटमोगरेकर, माजी आ. रोहिदास चव्हाण, राष्ट्रवादी शरदचंद्र पवारचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, शिवसेना उबाठाचे जिल्हाध्यक्ष भुजंग पाटील, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख बबन बारसे, (पान ५ वर...)

चौथ्या टी २० सामन्यामध्ये न्यूझीलंडकडून भारताचा पराभव

ऑकलंड (वृत्तसंस्था)– ऑकलंडच्या ईडन पार्क मैदानावर रंगलेल्या भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यातील चौथ्या टी–२० सामन्यात यजमान न्यूझीलंडने तुफानी कामगिरी करत टीम इंडियाचा ८७ धावांनी पराभव केला. ग्लेन फिलिप्सच्या १०७ धावांच्या स्फोटक शतकी खेळीच्या आणि मायकेल ब्रेसवेलच्या ६५ धावांच्या जोरावर न्यूझीलंडने निर्धारित २० षटकांत २५९ धावांचा डोंगर उभा केला होता. या धावांचा पाठलाग करताना पहिल्याच षटकात संजू सॅमसन व इशान किशन शून्यावर बाद झाल्याने भारतीय संघाची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली. अभिषेक शर्मा आणि कर्णधार श्रेयस अय्यरही दबावाखाली अपयशी ठरल्याने टीम इंडियाचा डाव १७२ धावांतच आटोपला.

सिंहस्थ महाध्वज प्रतिष्ठापना सोहळ्याला प्रारंभ, आज राष्ट्रपतींच्या हस्ते मुख्य धर्मध्वजारोहण

नाशिक (प्रतिनिधी)– आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये महाध्वज प्रतिष्ठापना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवार, ३० ऑक्टोबरपासून या सोहळ्याला प्रारंभ होत असून, तीन दिवस विविध धार्मिक विधी, ध्वजदंड प्रतिष्ठापना आणि भव्य नगरप्रदक्षिणा पार पडली आहे. शनिवार, ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते रामकुंड येथे मुख्य धर्मध्वजारोहण होणार आहे.

शुक्रवारी सकाळी ८.१५ वाजता ध्वजदंड प्रतिष्ठापना आणि नगरप्रदक्षिणेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. वेदमूर्ती भालचंद्र एकनाथशास्त्री शौचे गुरुजी आणि यज्ञाचार्य पंडित वैभव दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रोक्त पद्धतीने धार्मिक विधी पार पडला.

शनिवारी सकाळपासून स्थापित देवतांचे पूजन आणि धार्मिक कार्यक्रम सुरू होतील. सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत राष्ट्रपती आणि प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत संकल्प, गणेशपूजन, पंचार्घ्य समर्पण आणि तीर्थपूजन होईल.यानंतर दुपारी १२.०२ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते मुख्य सिंहस्थ महाध्वजारोहण करण्यात येणार आहे. यावेळी गोदाआरती आणि विशेष प्रार्थनेचेही आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी प्रतिष्ठापना हवन आणि पूजनाने दिवसाच्या कार्यक्रमाची सांगता होईल.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

पाणी आणि दहशतवाद

पाणी हा केवळ नैसर्गिक संसाधनाचा प्रश्न नसतो; तो एखाद्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा, अन्नसुरक्षेचा आणि राष्ट्रीय सुरक्षेचाही आधार असतो. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी सिंधू नदीच्या पाण्याचा प्रवाह रोखण्याचा, अडवण्याचा किंवा वळवण्याचा कोणताही प्रयत्न हा 'युद्धाची कृती' मानला जाईल, असा दिलेला इशारा केवळ राजनैतिक वक्तव्य म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. उलट, पाकिस्तानच्या राष्ट्रीय हिताच्या अत्यंत संवेदनशील मुद्द्यावर निर्माण झालेल्या दबावाची ही कबुली म्हणून त्याकडे पाहावे लागेल. भारत-पाकिस्तान संबंधांचा इतिहास संघर्षाने भरलेला आहे. १९७१ च्या युद्धात पाकिस्तानचा झालेला पराभव आणि बांगलादेशाची निर्मिती हा त्याच्या राजकीय आणि लष्करी इतिहासातील निर्णायक टप्पा होता. त्यानंतर भारताशी थेट पारंपरिक युद्ध करण्याऐवजी पाकिस्तानने छुप्या आणि दहशतवादी कारवायांचा मार्ग अधिक प्रमाणात स्वीकारल्याचा भारताचा सातत्यपूर्ण आरोप राहिला आहे. जम्मू-काश्मीरमधील दीर्घकाळ चाललेला दहशतवाद, २००१ मधील संसदेवरील हल्ला, २००८ चा मुंबई हल्ला, पठाणकोट, उरी, पुलवामा आणि त्यानंतरच्या दहशतवादी घटनांनी दोन्ही देशांतील संबंध सातत्याने तणावपूर्ण ठेवले. उरी हल्ल्यानंतर भारताने नियंत्रणरेषेपलीकडे दहशतवादी तळांवर सर्जिकल स्ट्राइक केला. पुलवामा हल्ल्यानंतर बालाकोटमधील कारवाईने भारताच्या धोरणात आणखी एक महत्त्वपूर्ण बदल दाखवून दिला. म्हणजेच दहशतवादी हल्ला झाला की केवळ निषेध, राजनैतिक दबाव आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील तक्रारी यापुरते भारताचे प्रत्युत्तर मर्यादित राहणार नाही, असा संदेश देण्यात आला. एप्रिल २०२५ मधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान संबंध पुन्हा गंभीरपणे बिघडले आणि त्यानंतरच्या लष्करी संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताने सिंधू जल कराराबाबतही कठोर भूमिका घेतली. १९ सप्टेंबर १९६० रोजी जागतिक बँकेच्या मध्यस्थीने झालेल्या या कराराने सिंधू खोऱ्यातील पाण्याचे विभाजन निश्चित केले होते. सिंधू, झेलम आणि चिनाब या पश्चिमेकडील नद्यांचा प्रमुख वापर पाकिस्तानला, तर रावी, बियास आणि सतलज या पूर्वेकडील नद्यांचा वापर भारताला देण्यात आला; तरीही दोन्ही देशांना काही विशिष्ट वापराचे अधिकार देण्यात आले आहेत. या कराराचे महत्त्व एवढेच नाही की तो दोन देशांमधील पाणीवाटपाचा दस्तऐवज आहे. त्याने १९६५, १९७१ आणि १९९९ च्या संघर्षांच्या काळातही दोन्ही देशांमधील जलव्यवस्थेची एक चौकट कायम ठेवली. त्यामुळे हा करार दक्षिण आशियातील दीर्घकाळ टिकलेल्या आंतरराष्ट्रीय करारांपैकी एक मानला जातो. मात्र दहशतवाद आणि पाणी यांना एकमेकांपासून पूर्णपणे वेगळे ठेवण्याचे जुने समीकरण आता बदलत असल्याचे दिसते. पाकिस्तानची शेती, सिंचन व्यवस्था, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि अन्नसुरक्षा सिंधू खोऱ्याच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. त्यामुळे जलप्रश्न हा पाकिस्तानसाठी केवळ परराष्ट्र धोरणाचा विषय नसून थेट जनजीवनाशी संबंधित प्रश्न आहे. याच कारणामुळे शरीफ यांचा 'युद्धाची कृती' हा इशारा लक्षवेधी ठरतो. एका बाजूला पाकिस्तान भारतावर पाण्याच्या प्रश्नाचा वापर राजकीय दबावासाठी केल्याचा आरोप करीत आहे; दुसऱ्या बाजूला भारत दहशतवाद आणि द्विपक्षीय संबंध यांचा संदर्भ देत आपल्या भूमिकेचे समर्थन करीत आहे. या संघर्षात भावनिक घोषणांपेक्षा आंतरराष्ट्रीय करार, त्यातील कायदेशीर तरतुदी आणि दोन्ही देशांची जबाबदारी महत्त्वाची ठरणार आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यापूर्वी मांडलेली 'रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही' ही भूमिका या बदललेल्या धोरणाचे प्रतीक मानली जाते. मात्र पाण्याचा प्रश्न युद्धाच्या धमक्यांपर्यंत पोहोचणे ही दक्षिण आशियासाठी चिंताजनक बाब आहे. पाणी हे संघर्षाचे शस्त्र बनण्याऐवजी सहकार्याचे माध्यम राहणेच दोन्ही देशांच्या दीर्घकालीन हिताचे आहे. पाकिस्तानसमोरही मूलभूत प्रश्न आहे की दहशतवाद आणि भारताशी संबंध याबाबतची भूमिका बदलल्याशिवाय जुन्या व्यवस्थेतील विश्वास पुन्हा निर्माण होणार कसा? भारतासमोरही तितकाच महत्त्वाचा प्रश्न आहे की, राष्ट्रीय सुरक्षेची कठोर भूमिका घेताना आंतरराष्ट्रीय जलकरारांच्या कायदेशीर आणि मानवी परिणामांचा समतोल कसा राखायचा? सिंधूचे पाणी लाखो लोकांच्या जीवनाशी जोडलेले आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर युद्धाच्या भाषेत नव्हे, तर स्पष्ट धोरण, राष्ट्रीय सुरक्षा, आंतरराष्ट्रीय कायदा आणि दीर्घकालीन जलव्यवस्थापन यांच्या चौकटीत शोधावे लागेल. पाकिस्तानच्या धमकीतून त्याची असुरक्षितता स्पष्ट होत असेल, तर भारताच्या भूमिकेची खरी कसोटी त्या दबावाचा वापर किती संयमित, कायदेशीर आणि दीर्घकालीन पद्धतीने केला जातो यात आहे.

राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल!



भारताची विविधता हीच भारताची ताकद आहे. भाषा वेगवेगळ्या, संस्कृती वेगवेगळ्या, परंपरा वेगवेगळ्या; धर्म वेगवेगळे मात्र देश एक आहे. ही एकात्मता केवळ भावनिक पातळीवर टिकवून ठेवायची नसते, तर त्यासाठी दूरदृष्टी, संघटन कौशल्य, बंधुता, निर्णयक्षमता आणि प्रसंगी कठोर भूमिका घेण्याची तयारीही आवश्यक असते. भारताच्या इतिहासात या गुणांचा प्रभावी प्रत्यय देणारे नेतृत्व म्हणजे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल. म्हणूनच त्यांची जयंती ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो.

राष्ट्रीय एकता दिवसाची सुरुवात कधी झाली

भारत सरकारने २०१४ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. २२ ऑक्टोबर २०१४ रोजी केंद्र शासनाने या निर्णयाची घोषणा केली. त्यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाने २४ ऑक्टोबर २०१४ रोजी राष्ट्रीय एकता दिवसाच्या आयोजनासंदर्भात अधिकृत प्रसिद्धिपत्रक जारी केले. ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी पहिला राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने ३१ ऑक्टोबर २०१७ रोजी एका आदेशाद्वारे त्यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करताना राष्ट्रीय एकतेची शपथ घेण्याचे निर्देशित केले आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये वक्तृत्व, निबंध, नाटीका, व्याख्याने, आयोजित करण्याचे स्पष्ट केले आहे.

सरदार पटेल यांनी स्वातंत्र्यलढ्यात दिलेले योगदान आणि स्वातंत्र्यानंतर संस्थानांचे विलीनीकरण करून भारताची एकात्मता दृढ करण्यासाठी केलेले ऐतिहासिक कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश होता. या दिवशी 'रन फॉर युनिटी', राष्ट्रीय एकतेची शपथ आणि संचलन यांसारख्या उपक्रमांद्वारे देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्याचा संदेश दिला जातो. म्हणजेच हा दिवस केवळ एका महान नेत्याच्या स्मरणाचा नसून, राष्ट्राच्या एकात्मतेप्रती आपली जबाबदारी पुन्हा अधोरेखित करण्याचा दिवस आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नातून घडलेले नेतृत्व

३१ ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरातमधील नडियाद येथे जन्मलेल्या वल्लभभाई पटेल यांनी वकिलीच्या क्षेत्रात यश मिळवले होते. मात्र महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव आणि देशाच्या स्वातंत्र्याची ओढ यामुळे त्यांनी सार्वजनिक जीवनाचा मार्ग स्वीकारला. १९१८ मधील खेडा सत्याग्रह हा त्यांच्या नेतृत्वाचा महत्त्वाचा टप्पा ठरला. पिकांचे नुकसान आणि आर्थिक अडचणींमुळे महसूल भरणे कठीण झालेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्यांनी संघटित लढा उभारला. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांना एकत्र आणणे आणि संयमाने संघर्ष पुढे नेणे, ही त्यांच्या नेतृत्वाची वैशिष्ट्ये या आंदोलनातून स्पष्ट झाली. निडर, निर्भय व बाणेदार नेतृत्व म्हणून ते हळूहळू राष्ट्रव्यापी झाले. १९२८ मधील बारडोली सत्याग्रहाने त्यांच्या नेतृत्वाला राष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख मिळवून दिली.

महसुलातील वाढीव आकारणीविरोधात शेतकऱ्यांनी एकजूट दाखवली. पटेल यांनी या आंदोलनाचे प्रभावी संघटन केले. शिस्तबद्ध, ठाम आणि अहिंसक संघर्षाच्या बळावर शेतकऱ्यांच्या प्रश्नाला न्याय मिळवून देण्याच्या या लढ्यामुळे त्यांना 'सरदार'ही उपाधी प्राप्त झाली. ही उपाधी त्यांना शेतकऱ्यांनी दिली. सरदार म्हणजे समूहाचा प्रमुख, नेता, नेतृत्व, मान्यता मिळालेला आदराचा माणूस त्यामुळे सरदार ही उपाधी केवळ सन्मानाची नव्हती; ती जनतेने त्यांच्या नेतृत्वावर दाखवलेल्या विश्वासाची पावती होती.

जनसेवेपासून स्वातंत्र्यलढ्यापर्यंत

अहमदाबाद नगरपालिकेतील त्यांच्या कार्यातून प्रशासनाकडे पाहण्याची व्यावहारिक दृष्टी दिसून आली. शहरातील स्वच्छता, पाणीपुरवठा आणि आरोग्यविषयक व्यवस्थांमध्ये सुधारणा करण्यावर त्यांनी भर दिला. सार्वजनिक पद म्हणजे अधिकार गाजवण्याचे साधन नसून, नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्याची जबाबदारी आहे, हा दृष्टिकोन त्यांच्या कामातून दिसतो. पुढे या अहमदाबाद नगर पालिकेचा अध्यक्ष देशाचा लोहपुरुष म्हणून नावलौकिकास आला.

१९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत आणि १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. स्वातंत्र्यलढ्यातील सहभागामुळे त्यांना कारावास भोगावा लागला. संघटनकौशल्य, निर्णयक्षमता आणि जनतेला एकत्र आणण्याची क्षमता या गुणांच्या बळावर ते राष्ट्रीय चळवळीतील प्रमुख नेत्यांपैकी एक बनले.

स्वातंत्र्यानंतरची ऐतिहासिक जबाबदारी

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला; पण स्वातंत्र्य मिळाले म्हणजे देशाची राजकीय एकात्मता पूर्ण झाली, असे नव्हते. त्या वेळी ब्रिटिश भारताबरोबरच ५६० हून अधिक संस्थाने अस्तित्वात होती. ब्रिटिश सत्तेचा अंत झाल्यानंतर या संस्थानांच्या भवितव्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा बनला. अनेक संस्थानांचे स्वतंत्र राहण्याचे किंवा भारत-पाकिस्तान यांपैकी एखाद्या देशात सामील होण्याचे पर्याय विचाराधीन होते. अशा परिस्थितीत भारताचे राजकीय विभाजन टाळणे, हे नव्या नेतृत्वापुढील मोठे आव्हान होते. स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री म्हणून सरदार पटेल यांनी संस्थानांच्या विलीनीकरणाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. व्ही. पी. मेनन यांच्यासारख्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने त्यांनी संस्थानिकांशी चर्चा, समजूत, मुत्सद्देगिरी आणि परिस्थितीनुसार ठाम प्रशासकीय निर्णय यांचा वापर केला. त्यांच्या नेतृत्वामुळे विविध संस्थाने भारतीय संघराज्यात सामील होण्याची प्रक्रिया पुढे गेली. हे काम केवळ राजकीय करारांचे नव्हते; भारताच्या भविष्यातील भौगोलिक अखंडतेचा आणि प्रशासनाच्या स्थैर्याचा तो पाया होता.

जुनागढ आणि हैदराबाद : निर्णयक्षमतेची कसोटी

जुनागढच्या संस्थानाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा भारताच्या भौगोलिक आणि राजकीय हितांचा विचार करून पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. पुढे हैदराबाद संस्थानाच्या भारतातील विलीनीकरणाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा ठरला. वाटाघाटी आणि प्रयत्नांनंतरही प्रश्न सुटत नसल्याने सप्टेंबर १९४८ मध्ये 'ऑपरेशन पोलो' ही पोलीस कारवाई करण्यात आली. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबादच्या विलीनीकरणाचा मार्ग मोकळा झाला. या घटनांमधून राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रश्नावर त्यांनी मुत्सद्देगिरीसोबतच आवश्यक तेव्हा कठोर निर्णय घेण्याची तयारीही दाखवली.

संस्थानांच्या विलीनीकरणाबरोबरच स्वतंत्र भारताची प्रशासकीय चौकट सक्षम करण्यावरही पटेल यांनी भर दिला. अखिल भारतीय सेवांच्या बळकटीकरणासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. देशाच्या विविध भागांत प्रशासनाची सातत्यपूर्ण आणि समन्वयित यंत्रणा कार्यरत राहणे, हे राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक आहे, याची त्यांना जाणीव होती. एकसंघ भारताची पायाभरणी

स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर भारतासमोर केवळ परकीय सत्तेतून मुक्त होण्याचे आव्हान नव्हते; तर अनेक संस्थाने, विविध राजकीय हितसंबंध आणि अनिश्चित भविष्य यांना एकाच राष्ट्रीय चौकटीत आणण्याचेही आव्हान होते. अशा निर्णायक काळात सरदार वल्लभभाई पटेल यांनी दूरदृष्टी, मुत्सद्देगिरी, धैर्य आणि ठाम निर्णयक्षमतेच्या बळावर संस्थानांच्या विलीनीकरणाला गती दिली. त्यामुळे आधुनिक भारताच्या राजकीय एकात्मतेचा पाया अधिक भक्कम झाला. आज आपण एकसंध भारताचे नागरिक म्हणून अभिमानाने उभे आहोत, त्या ऐतिहासिक प्रक्रियेत सरदार पटेल यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. म्हणूनच त्यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करणे, हा इतिहासाचा गौरव करण्याबरोबरच भारताची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्याच्या संकल्पाचे नूतनीकरण करण्याचा दिवस आहे.

-प्रवीण टाके
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर
मो. ९७०२८५८७७७

राष्ट्रीय एकता : विविधतेतील एकात्मतेचा संकल्प

भारत हा विविधतेने नटलेला, सांस्कृतिक समृद्धीचा प्रदीर्घ वारसा लाभलेला आणि लोकशाही मूल्यांवर आधारित राष्ट्र आहे. या देशाची खरी ओळख केवळ त्याच्या भौगोलिक विस्तारात किंवा लोकसंख्येत नाही, तर विविध भाषा, धर्म, जाती, पंथ, संस्कृती, परंपरा आणि जीवनपद्धती यांना सामावून घेणाऱ्या सामाजिक रचनेत आहे. हिमालयाच्या उत्तुंग पर्वतरांगांपासून कन्याकुमारीच्या समुद्रकिनाऱ्यापर्यंत आणि राजस्थानच्या वाळवंटी प्रदेशापासून ईशान्य भारतातील हिरव्यागार डोंगराळ भागांपर्यंत प्रत्येक प्रदेशाचे स्वतंत्र भौगोलिक, सांस्कृतिक आणि सामाजिक वैशिष्ट्य आहे. प्रत्येक राज्याची भाषा, लोककला, खाद्यसंस्कृती, वेशभूषा आणि सण-उत्सव वेगवेगळे असले, तरी या सर्वांना जोडणारा समान धागा म्हणजे भारतीयत्व. विविधतेचा स्वीकार करून परस्परांविषयी आदर, विश्वास, सहकार्य आणि बंधुभाव निर्माण करणे म्हणजे राष्ट्रीय एकता होय. राष्ट्रीय एकता ही केवळ भावनिक संकल्पना नसून देशाच्या सामाजिक स्थैर्याचा, लोकशाहीच्या बळकटीकरणाचा आणि सर्वांगीण विकासाचा मूलभूत आधार आहे.

दरवर्षी ३१ ऑक्टोबर हा दिवस भारतात राष्ट्रीय एकता दिन म्हणून साजरा केला जातो. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यासाठी पाळला जातो. स्वातंत्र्यानंतर भारताच्या एकीकरणामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. तथापि, या दिवसाचे महत्त्व केवळ एका ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाच्या कार्याचे स्मरण करण्यापुरते मर्यादित नाही. आजच्या बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीत देशाची एकता टिकविणे, सामाजिक सलोखा वाढविणे आणि नागरिकांमध्ये राष्ट्रीय जबाबदारीची जाणीव निर्माण करणे ही या दिवसाची व्यापक उद्दिष्टे आहेत. देशाची अखंडता टिकविण्यासाठी केवळ भौगोलिक सीमा सुरक्षित असणे पुरेसे नाही, तर देशातील नागरिकांची मने एकमेकांशी जोडलेली असणेही तितकेच आवश्यक आहे. म्हणूनच राष्ट्रीय एकता दिन हा प्रत्येक भारतीयाला आपल्या सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे.

राष्ट्रीय एकता म्हणजे सर्वांनी एकाच भाषेत बोलणे, एकाच धर्माचे पालन करणे किंवा एकसारखी जीवनशैली स्वीकारणे नव्हे. प्रत्येक व्यक्तीला आपली भाषा, धर्म, संस्कृती, परंपरा आणि विचार जपण्याचे स्वातंत्र्य असतानाही इतरांच्या वेगळेपणाचा आदर करून देशाच्या व्यापक हितासाठी एकत्र येणे म्हणजे राष्ट्रीय एकता.

भारतीय स्वातंत्र्यलढा हा राष्ट्रीय एकतेच्या सामर्थ्याचे प्रभावी उदाहरण आहे. देशाच्या विविध भागांतील लोकांनी स्वातंत्र्याच्या समान ध्येयासाठी आपापले प्रादेशिक, भाषिक, धार्मिक आणि सामाजिक भेद बाजूला ठेवून संघर्ष केला. शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला, आदिवासी, सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक यांनी या चळवळीत सहभाग घेतला. वेगवेगळ्या भाषा बोलणारे, वेगवेगळ्या धर्मांचे आणि सामाजिक पार्श्वभूमीचे लोक एका राष्ट्रीय उद्दिष्टासाठी एकत्र आले. या सामूहिक सहभागामुळे स्वातंत्र्याची चळवळ व्यापक झाली. या इतिहासातून एक महत्त्वाचा संदेश मिळतो की समाजातील विविध घटकांमध्ये परस्परविश्वास आणि सहकार्याची भावना निर्माण झाली, तर मोठी राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करणे शक्य होते. स्वातंत्र्यानंतरही देशाच्या विकासासाठी, लोकशाहीच्या संरक्षणासाठी आणि सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी याच एकजुटीची आवश्यकता आहे.

भारतीय संविधान हे राष्ट्रीय एकतेचे सर्वांत महत्त्वाचे अधिष्ठान आहे. संविधानाच्या उद्देशिकेत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा समावेश करण्यात आला आहे. ही मूल्ये केवळ कायदेशीर तरतुदी नसून भारतीय समाजाला एकत्र बांधणारी जीवनमूल्ये आहेत. प्रत्येक नागरिकाला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय मिळावा, विचार व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य लाभावे, संधींची समानता उपलब्ध व्हावी आणि व्यक्तीची प्रतिष्ठा जपत बंधुभाव वाढावा, हा संविधानाचा व्यापक दृष्टिकोन आहे. संविधानाने सर्व नागरिकांना समान नागरिकत्व दिले आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीचे स्थान तिच्या जातीवर, धर्मावर, भाषेवर, लिंगावर किंवा जन्मस्थानावरून ठरत नाही. प्रत्येक नागरिक हा राष्ट्राचा समान घटक आहे, ही जाणीव राष्ट्रीय एकतेला बळ देते. संविधानातील मूल्यांचे पालन करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

राष्ट्रीय एकतेच्या प्रक्रियेत आदिवासी आणि दुर्गम भागांतील समाजघटकांचा सहभाग विशेष महत्त्वाचा आहे. आदिवासी समुदायांची भाषा, संस्कृती, लोकपरंपरा, पर्यावरणविषयक ज्ञान आणि जीवनपद्धती भारतीय सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग आहेत. वारली, भिल्ल, कोकणा, गोंड, संथाल आणि इतर अनेक आदिवासी समुदायांनी देशाच्या सांस्कृतिक समृद्धीत मोलाचे योगदान दिले आहे. मात्र अनेक आदिवासी भागांत शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेबाबत आजही अडचणी आहेत. विकासाच्या प्रक्रियेत त्यांना समान संधी मिळणे, त्यांच्या जमिनी, भाषा, संस्कृती आणि परंपरांचे संरक्षण होणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाला विकासाच्या प्रवाहात सहभागी करून घेताना त्यांच्या स्वतंत्र सांस्कृतिक ओळखीचा आदर केला पाहिजे. विकासाच्या संधींपासून कोणताही समाजघटक वंचित राहिल्यास राष्ट्रीय एकतेची भावना कमकुवत होऊ शकते. म्हणूनच समावेशक विकास हा राष्ट्रीय एकात्मतेचा महत्त्वाचा आधार आहे.

राष्ट्रीय एकता आणि राष्ट्रीय सुरक्षा यांचाही परस्परांशी घनिष्ठ संबंध आहे. देशाच्या सीमांचे संरक्षण करण्यासाठी सक्षम संरक्षण व्यवस्था आवश्यक असते; मात्र देशांतर्गत सामाजिक शांतता, नागरिकांमधील विश्वास आणि लोकशाही संस्थांवरील श्रद्धाही तितकीच महत्त्वाची असते. दहशतवाद, फुटीरतावादी प्रवृत्ती, हिंसाचार आणि बाह्य हस्तक्षेप यांसारख्या आव्हानांचा सामना करताना समाजातील एकजूट महत्त्वाची ठरते. नैसर्गिक आपत्ती, महामारी किंवा इतर आणीबाणीच्या परिस्थितीत नागरिकांनी परस्परांना मदत करणे ही राष्ट्रीय एकतेची जिवंत अभिव्यक्ती आहे. पूर, भूकंप, दुष्काळ किंवा इतर संकटांमध्ये मदतीसाठी पुढे येणारे स्वयंसेवक, सामाजिक संस्था, प्रशासन आणि सामान्य नागरिक हे एकात्मतेचे सामर्थ्य दाखवून देतात. संकटाच्या काळात माणुसकीला प्राधान्य देणारा समाजच खऱ्या अर्थाने एकसंघ राहू शकतो.

३१ ऑक्टोबरचा राष्ट्रीय एकता दिन आपल्याला याच व्यापक जबाबदारीची जाणीव करून देतो. या दिनानिमित्त आपण केवळ राष्ट्रीय एकात्मतेच्या घोषणा देऊन थांबू नये, तर आपल्या विचारांत आणि कृतीत समता, सहिष्णुता, बंधुभाव आणि सहकार्याची मूल्ये रुजविण्याचा संकल्प केला पाहिजे. दुसऱ्याच्या भाषेचा, धर्माचा, संस्कृतीचा आणि विचारांचा आदर करणे, अन्याय व भेदभावाविरुद्ध उभे राहणे, अफवांपासून दूर राहणे आणि समाजातील दुर्बल घटकांना विकासाच्या प्रवाहात सहभागी करून घेणे या माध्यमातून राष्ट्रीय एकतेला प्रत्यक्ष बळ देता येईल. भारताची खरी ताकद त्याच्या विविधतेत आहे आणि त्या विविधतेला एकत्र बांधणाऱ्या बंधुभावात आहे. विविधतेचा सन्मान, समानतेचा स्वीकार आणि संविधानिक मूल्यांचे आचरण या त्रिसूत्रीवरच समर्थ, समृद्ध आणि एकसंघ भारताची उभारणी होऊ शकते. राष्ट्रीय एकता ही केवळ एका दिवसाची आठवण न राहता प्रत्येक भारतीयाच्या जीवनाचा अविभाज्य संस्कार बनली, तरच राष्ट्रीय एकता दिनाचा खरा हेतू साध्य होईल.

-डॉ. राजेंद्र बगाटे
हिंगोली

माणसं ऑनलाइन, नाती मात्र ऑफलाइन!

आजच्या आधुनिक जगात माणसाच्या हातात स्मार्टफोन आला, जगाशी जोडले जाण्याची साधने आली; परंतु दुर्दैवाने माणसामाणसांतील संवाद मात्र कमी होत चालला आहे.एका क्लिकवर हजारो मैलांवरील व्यक्तीशी संपर्क साधता येतो, पण घरात समोर बसलेल्या माणसाशी दोन प्रेमाचे शब्द बोलण्यासाठी वेळ मिळत नाही, ही आजच्या समाजजीवनातील विसंगती आहे.

मोबाइलच्या छोट्याशा पडद्यावर संपूर्ण जग सामावले आहे; पण त्याच पडद्यामुळे आपल्या घरातील माणसांचे चेहरे, त्यांच्या भावना आणि त्यांच्या मनातील प्रश्न दुर्लक्षित होत आहेत. घरात चार माणसे एकत्र बसलेली असतात, पण प्रत्येकाचे लक्ष वेगवेगळ्या मोबाइलमध्ये गुंतलेले असते. संवाद संपतो, शांतता वाढते आणि नात्यांमधील जिव्हाळा हळूहळू कमी होऊ लागतो.

आज सोशल मीडियावर आनंदाचे क्षण प्रदर्शित करण्याची स्पर्धा सुरू आहे.वाढदिवस, विवाहसोहळे, सहली, सण आणि कौटुंबिक कार्यक्रमांचे फोटो मोठ्या उत्साहाने प्रसारित केले जातात. शेकडो शुभेच्छा मिळतात, लाइक्सचा वर्षाव होतो; परंतु एखाद्या व्यक्तीच्या दुःखाच्या वेळी तिच्या जवळ बसून धीर देणारे किती जण असतात?आभासी जगातील गर्दी आणि प्रत्यक्ष जीवनातील एकाकीपणा यातील अंतर दिवसेंदिवस वाढत आहे.

विशेषतः वृद्ध व्यक्तींच्या जीवनात ही समस्या अधिक प्रकर्षाने जाणवते. मुलांच्या शिक्षणासाठी, नोकरीसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी आयुष्यभर कष्ट करणारे आई-वडील वृद्धापकाळात मुलांच्या सहवासासाठी आसुसलेले असतात. त्यांना महागड्या भेटवस्तूंपेक्षा दोन क्षणांचा संवाद, प्रेमाने विचारलेली विचारपूस आणि आपलेपणाची जाणीव अधिक मोलाची वाटते. मात्र अनेकदा त्यांच्या वाट्याला येते ती एकाकी शांतता.

दुसरीकडे, तरुण पिढीही डिजिटल जगाच्या आकर्षणात मानसिक ताण, तुलना आणि असुरक्षिततेचा सामना करीत आहे. इतरांचे यश, आनंद आणि झगमगाट पाहून स्वतःच्या आयुष्याबद्दल न्यूनगंड निर्माण होण्याची शक्यता वाढते. प्रत्यक्ष जीवनातील साधेपणा आणि आभासी जगातील कृत्रिम चमक यांची तुलना करताना अनेकजण स्वतःच्या आनंदापासून दूर जातात.याचा अर्थ तंत्रज्ञान वाईट आहे, असा मुळीच नाही. तंत्रज्ञान हे माणसाच्या प्रगतीचे प्रभावी साधन आहे.त्याचा वापर ज्ञान, शिक्षण, आरोग्य, संवाद आणि सामाजिक परिवर्तनासाठी झाला पाहिजे.मात्र साधनाने माणसावर वर्चस्व गाजवू नये.मोबाइल आपल्या हातात असावा, पण आपल्या आयुष्याचा आणि नात्यांचा ताबा त्याने घेऊ नये.

आज प्रत्येक कुटुंबाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहेआपण आपल्या माणसांसाठी खरोखर वेळ देतो आहोत का? घरात जेवताना मोबाइल बाजूला ठेवणे, मुलांशी मनमोकळा संवाद साधणे, वृद्धांच्या अनुभवांना कान देणे, मित्रांची प्रत्यक्ष भेट घेणे आणि गरजू व्यक्तीच्या दुःखात सहभागी होणे, या छोट्या कृती नात्यांना नवसंजीवनी देऊ शकतात.समाजातील माणुसकी टिकविण्यासाठी मोठ्या आंदोलनांची किंवा भव्य उपक्रमांचीच गरज नसते. कधी एखाद्या एकाकी वृद्धाची विचारपूस, निराश मित्राला दिलेला आधार, शेजाऱ्याच्या अडचणीत केलेली मदत किंवा कुटुंबातील सदस्यासोबत घालवलेला संवाद हीच खरी सामाजिक बांधिलकी ठरते.

आजच्या काळात माणसाला जोडणारे तंत्रज्ञान वाढले आहे; पण माणसाला समजून घेणारी संवेदना कमी होऊ नये. संपर्कांच्या यादीत हजारो नावे असण्यापेक्षा संकटाच्या वेळी सोबत उभे राहणारे चार माणसे असणे अधिक महत्त्वाचे आहे.

शेवटी, आधुनिकतेचा खरा अर्थ केवळ डिजिटल प्रगती नसून मानवी नात्यांची समृद्धी हा आहे. जगाशी जोडले जाताना आपल्या माणसांपासून तुटू नये. कारण मोबाइलची बॅटरी संपली तर चार्ज करता येते; पण नात्यांमधील जिव्हाळा संपला तर तो पुन्हा निर्माण करण्यासाठी कधी कधी संपूर्ण आयुष्यही अपुरे पडते.

माणसं ऑनलाइन जोडली जात असताना नाती ऑफलाइन तुटू नयेत, हीच आजच्या समाजाची खरी गरज आहे.

-पंडित पवळे
शिक्षणयोगी, नांदेड

सुरक्षिततेविषयी जागरूकता ही काळाची गरज!

'सुरक्षित बचपन अभियान'अंतर्गत जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

नांदेड (प्रतिनिधी)– बालकांचे हक्क, संरक्षण आणि लैंगिक अत्याचारांपासून बचाव करण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा परिषद शिक्षण विभाग आणि बाल कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात 'सुरक्षित बचपन अभियान' राबविण्यात येत आहे. २६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित या अभियानांतर्गत विविध शाळांमध्ये कायदेविषयक मार्गदर्शन, जनजागृती आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नरेंद्र के. ब्रह्मे यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

अभियानाची सुरुवात २६ ऑक्टोबर रोजी येथील नागार्जुना पब्लिक स्कूल येथे कायदेविषयक शिबिराने झाली. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना बालकांचे हक्क, बालकांचे शारीरिक व लैंगिक शोषण रोखण्यासाठी घ्यावयाची काळजी आणि बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्याविषयी (पोक्सो) मार्गदर्शन केले. शिक्षणासोबतच स्वतः

च्या सुरक्षिततेविषयी जागरूक राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. गैरवर्तनाचा प्रसंग उद्भवल्यास न घाबरता त्याचा प्रतिकार करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विद्या आळणे यांनी बालकांसाठी उपलब्ध असलेल्या १०९८ या बाल मदतसेवा क्रमांकाची माहिती दिली. बालकल्याण समितीचे राजवंतसिंग कदम्ब यांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि आपत्कालीन मदतसेवांविषयी मार्गदर्शन केले. अॅड. शीतल गायकवाड यांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालकांसोबत शिक्षकांची भूमिका स्पष्ट केली, तर अॅड. कृष्णा तिडके यांनी समाजमाध्यमांच्या अतिवापरापासून दूर राहून शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. अॅड. आकाश लाडे यांनी पोक्सो कायद्याची प्राथमिक माहिती दिली.

२७ ऑक्टोबर रोजी किड्स किंगडम पब्लिक स्कूल येथे आयोजित कार्यक्रमात सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) ए. जी. चव्हाण यांनी बालकांच्या संरक्षणाविषयी मार्गदर्शन केले. अॅड. बी. डी. गावंडे यांनी 'गुड टच' आणि 'बॅड टच' यातील फरक समजावून सांगितला, तर विद्या आळणे यांनी जिल्हा बाल संरक्षण कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली.

२८ ऑक्टोबर रोजी पोदार इंटरनॅशनल स्कूल येथे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) पी. ए. खंदारे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. यावेळी बालकांचे हक्क, वैयक्तिक सुरक्षितता आणि पोक्सो कायद्याविषयी जागरूक राहण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

२९ ऑक्टोबर रोजी सना उर्दू हायस्कूल येथे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) के. बी. सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली जनजागृती कार्यक्रम झाला. अॅड. व्ही. जे. जोशी, मुख्याध्यापक अनिस तबसुम, राजवंतसिंग कदम्ब आणि विद्या आळणे यांनी लघुपटाच्या माध्यमातून तसेच मार्गदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांना बालकांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांची माहिती दिली.

शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल येथे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) एम. आर. कायस्थ यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. यावेळी अॅड. एम. आर. मुधोळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ३१ ऑक्टोबर रोजी गुरुकुल इंग्लिश स्कूल येथे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) एम. पी. राठोड यांच्या अध्यक्षतेखाली आणि अॅड. विजयमाला मनवर यांच्या उपस्थितीत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

या अभियानाच्या माध्यमातून बालकांचे हक्क, सुरक्षितता, कायदेशीर संरक्षण आणि संकटाच्या वेळी मदत मिळविण्याच्या उपाययोजनांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होत आहे. या उपक्रमाचे शैक्षणिक संस्था आणि विद्यार्थ्यांकडून स्वागत करण्यात येत आहे.

खडकपुऱ्यातील दर्गाह दुल्हा शाह रहमानच्या ३५ एकर वक्फ जमिनीला अखेर न्याय! तात्पुरता मुतवल्ली बरखास्त, ११ वर्षांच्या संघर्षाला यश

भू- माफियांच्या डावपेचाला चाप; दर्गाह- मशीद जमीन आता शिक्षण आणि रोजगारासाठी वापरणार

नांदेड (प्रतिनिधी)– शहरातील वजिराबाद, खडकपुरा येथील ऐतिहासिक दर्गाह हजरत दुल्हा शाह रहमान शहीद व मशिदीच्या सुमारे ३५ एकर वक्फ जमिनीचा ताबा अखेर वक्फ बोर्डाकडे बहाल करण्यात आला आहे. वक्फ महामंडळाच्या दि. २५ ऑगस्ट २०२६ च्या आदेशान्वये तात्पुरत्या मुतवल्लीला बरखास्त करण्यात आले असून, स्थानिक रहिवाशांच्या तब्बल ११ वर्षांच्या सततच्या संघर्षाला यश मिळाले आहे.

या लढ्यासाठी सहकार्य केलेल्या मुख्यमंत्री, औकाफ मंत्री, अल्पसंख्याक आयोग, खासदार, आमदार, स्व. शब्बीर अहमद अन्सारी, चैतन्यबापू देशमुख, महसूल विभाग आणि सर्व पत्रकार बांधवांचे स्थानिक समितीने आभार मानले आहेत.

रबी-उल-अव्वल १३०० हिजरी रोजी हैदराबादच्या निजामाने नांदेडच्या वजिराबाद, खडकपुरा येथील हजरत अब्दुल्ला शाह माजी उर्फ दुल्हा शाह रहमान शहीद (रह.) यांना दर्गा आणि मशिदीसाठी ३६ बिघा जमीन इनाम (दान) म्हणून दिली होती. त्यावेळी हा परिसर पूर्णपणे ओसाड होता.

१९२० साली जवळच उस्मान शाही मिल्सची पायाभरणी झाली. त्यावेळी नांदेडची लोकसंख्या ६० हजारांपेक्षाही कमी होती. मिलच्या १५३ एकर जमिनीवर कामगारांसाठी चाळी, बंगले बांधण्यात आले. मिलमध्ये मुस्लीम कामगारांची संख्या अधिक असल्याने १९५० साली स्थानिक रहिवाशांनी दर्गाहच्या मशिदीचे बांधकाम व विस्तार केला. ही मशीद खडकपुरा परिसरात 'जामिया मशीद' म्हणून प्रसिद्ध झाली.

वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन १९७७ मध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने नांदेड नगरपालिकेने वक्फ बोर्डाकडून दफनभूमीसाठी ३ एकर जमीन खरेदी केली होती.

लोकसंख्या वाढल्याने जमिनीच्या किमती वाढल्या आणि काही भू- माफियांनी बनावट दस्तऐवजांच्या आधारे दर्गाहच्या मौल्यवान जमिनीवर तसेच उस्मानशाही मिल्सच्या सरकारी जमिनीवर बेकायदेशीर कब्जा करण्याचे डावपेच सुरू केले.

वक्फ कायदा १९९५ च्या विरुद्ध जाऊन दान केलेल्या जमिनीची खरेदी- विक्री आणि बेकायदेशीर ताबा वाढत होता. स्थानिक दर्गाह व मशीद समितीने २०१५ पासून वक्फ बोर्डाच्या सर्व पदाधिकाऱ्यांना ठोस कागदपत्रांसह तक्रारी करूनही कारवाई प्रलंबित होती. सेवा शर्तींवर बहाल असलेली इनामी जमीन भू- माफियांच्या हाती जात होती. अखेर पुराव्यांच्या आधारे वक्फ महामंडळाने २५ ऑगस्ट २०२६ रोजी तात्पुरत्या मुतवल्लीला बरखास्त केले आणि जमीन वक्फ बोर्डाच्या ताब्यात घेतली.

शिवाजी विश्वनाथराव डोंगरे यांना 'उद्योगरत्न पुरस्कार' जाहीर

शंकरनगर (प्रतिनिधी)– बिलोली तालुक्यातील अटकळी गावचे भूमिपुत्र शिवाजी विश्वनाथराव डोंगरे यांना स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सन २०२५-२६ साठीचा प्रतिष्ठेचा 'उद्योगरत्न पुरस्कार' जाहीर झाला आहे. हा पुरस्कार ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी पुणे येथील स्वारगेट येथे आयोजित सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहे.

या पुरस्काराच्या घोषणेमुळे अटकळी गावासह परिसरात आनंदाचे वातावरण असून, डोंगरे यांच्यावर गावातील प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, अडत व्यापारी व उद्योजकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या निधीतून तीन शाळांना ओपन जिम मंजूर

नगराध्यक्षा कोटलवार यांच्या प्रयत्नाला यश

कुंडलवाडी (प्रतिनिधी)– विद्यार्थ्यांचे शारीरिक आरोग्य सुदृढ राहावे, त्यांच्यामध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी आणि शालेय जीवनापासूनच निरोगी जीवनशैलीची सवय लागावी, या उद्देशाने कुंडलवाडी शहरातील तीन शाळांमध्ये 'ओपन जिम'ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या निधीतून नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे.

खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या प्रयत्नांतून ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ओएनजीसी) यांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) निधीतून नांदेड जिल्ह्यातील शासकीय व अनुदानित शाळांमध्ये ओपन जिम योजना राबविण्यात येत आहे. याच उपक्रमांतर्गत कुंडलवाडी शहरातील जिल्हा परिषद हायस्कूल, कै. गंगाबाई पोटन्ना सब्बनवार शाळा आणि मिलिंद विद्यालय या तीन शाळांमध्ये ओपन जिमची सुविधा उपलब्ध झाली आहे.

नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलवार आणि उपनगराध्यक्षा सौ. नेहा शैलेश ऱ्याकावार यांनी विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी ओपन जिम उपलब्ध करून देण्याची मागणी खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्याकडे केली होती. या मागणीसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आता शाळेच्या परिसरातच व्यायामाची सुविधा मिळणार आहे.

ओपन जिममधील विविध व्यायाम उपकरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नियमित व्यायाम करता येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता वाढण्यास, आरोग्य सुदृढ राहण्यास आणि व्यायामाची गोडी निर्माण होण्यास मदत होणार आहे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या आरोग्यालाही प्राधान्य देणारा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

शरदचंद्र पवार विधी महाविद्यालयात 'विधी उत्सव २०२६' व पदवी प्रदान सोहळा उत्साहात

नांदेड (प्रतिनिधी)– येथील जय जवान जय किसान शिक्षण प्रसारक मंडळ कंधार संचलित शरदचंद्र पवार विधी महाविद्यालयात २४ ऑक्टोबर रोजी 'विधी उत्सव २०२६' अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच विधी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या पदवीधरांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना नांदेड जिल्हा व सत्र न्यायालयाचे प्रमुख जिल्हा न्यायाधीश नरेंद्र ब्रह्मे म्हणाले, जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाला पर्याय नाही. सातत्यपूर्ण अभ्यासातूनच निश्चितपणे ध्येय प्राप्त होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. सुनील धोंडगे

होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना कायद्याचे महत्त्व पटवून देत सांगितले की, मागास व दुर्गम भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांचे वकील, न्यायाधीश होण्याचे स्वप्न शरदचंद्र पवार विधी महाविद्यालय पूर्ण करत आहे. धोंडगे परिवाराने नेहमीच समाजसेवा व शैक्षणिक विकासाला प्राधान्य दिले आहे. लोहा, कंधारसारख्या ग्रामीण भागात स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थांमधून गोरगरिबांची लेकरं उच्चपदस्थ अधिकारी होतात याचे आम्हाला आत्मिक समाधान लाभते.

या सोहळ्याला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे उपनिबंधक डॉ. रवि सरोदे, स्वारातीम विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, नांदेड जिल्हा अभिवक्ता संघाचे जिल्हाध्यक्ष अॅड. युदुपत अर्धापूरकर, जिल्हा व सत्र न्यायालयाचे माजी सहायक अधीक्षक अॅड. नितीन कागणे, मराठी चित्रपट अभिनेते अनिल मोरे, ज्योती धोंडगे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

यावेळी अभिनेते अनिल मोरे यांनी आपल्या शैलीदार शेरो-शायरीतून वकिली व्यवसायाची महती सांगताना विद्यार्थ्यांना वकिली फॅशन म्हणून करायची की पॅशन म्हणून, हे आधी ठरवा, असा मोलाचा सल्ला दिला. तसेच 'यशवंत कॉलेज'मध्ये शिकत असताना लायब्ररीतून पुस्तके वाचण्यासाठी चोरून नेल्याचा किस्सा सांगताच सभागृहात एकच हशा पिकला. इतर उपस्थित मान्यवरांनीही विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य अॅड. एम. बी. अली यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका विषद केली आणि महाविद्यालयाची गुणवत्ता, सोयी-सुविधा व उज्ज्वल यशाच्या परंपरेचा आढावा घेतला.

भोकर रेल्वे स्थानकावर अग्निसुरक्षा जनजागृती परिसंवादाचे आयोजन

नांदेड (प्रतिनिधी)– प्रवासी तसेच रेल्वे कर्मचाऱ्यांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने भोकर रेल्वे स्थानकावर अग्निसुरक्षा जनजागृती परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. आपत्कालीन परिस्थिती आग लागल्यास तातडीने आणि योग्य पद्धतीने प्रतिसाद कसा द्यावा, याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

हा जनजागृती कार्यक्रम के. राम भारोसे, वरिष्ठ मुख्य विभागीय सुरक्षा अधिकारी, नागरी संरक्षण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. रुद्र डिगोले, नागरी संरक्षण यांनी यावेळी उपस्थित प्रवासी व रेल्वे कर्मचाऱ्यांना अग्निसुरक्षेच्या विविध बाबींविषयी माहिती दिली.

परिसंवादादरम्यान आगीचे विविध प्रकार, आग लागण्याची संभाव्य कारणे, आग लागल्याचे लक्षात आल्यानंतर घ्यावयाची तातडीची खबरदारी आणि आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षितपणे बाहेर पडण्याचे मार्ग याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच आगीच्या प्रकारानुसार योग्य अग्निशामक यंत्राची निवड आणि त्याचा योग्य पद्धतीने वापर कसा करावा, याबाबत माहिती देण्यात आली.

रेल्वे स्थानकांसारख्या सार्वजनिक ठिकाणी मोठ्या संख्येने प्रवासी उपस्थित असल्याने कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर निर्णय घेणे, घाबरून न जाता शांत राहणे आणि उपलब्ध सुरक्षा साधनांचा योग्य वापर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या अनुषंगाने आग प्रतिबंधक उपाययोजना तसेच आपत्कालीन परिस्थितीत स्वतःची आणि इतरांची सुरक्षितता कशी सुनिश्चित करावी, यावर विशेष भर देण्यात आला.

अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक प्रश्नांच्या निवारणासाठी ६ नोव्हेंबर रोजी तालुकास्तरीय कर्मचारी समाधान शिबीर

नांदेड (प्रतिनिधी)– शासन सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक समस्या व प्रलंबित प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्यासाठी तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, नांदेड यांच्या कार्यालयात शुक्रवार, दि. ६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कर्मचारी समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या दि. २ मे २०२६ रोजीच्या परिपत्रकानुसार कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी कर्मचारी समाधान शिबीर आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार तहसीलदार, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली तहसीलदार कार्यालयातील त्यांच्या कक्षात हे शिबीर होणार आहे.

या शिबिरामध्ये वेतन, बढती, बदली, निवृत्तिवेतन, सेवानिवृत्ती उपदान, रजा, सेवापुस्तिका अद्ययावतीकरण, अनुकंपा नियुक्ती तसेच इतर सेवाविषयक प्रकरणांबाबतच्या समस्या व तक्रारींचा आढावा घेऊन त्यांचे निराकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

नांदेड तालुक्यातील शासन सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवाविषयक प्रलंबित प्रकरणांच्या निवारणासाठी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार, नांदेड यांनी केले आहे.

मराठवाडा पदवीधर निवडणुकीतील विजयाचा अर्धापुरात जल्लोष

अर्धापूर (प्रतिनिधी)– मराठवाडा पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह पाटील हे विजयी झाल्यामुळे शहरातील पू. अहिल्याबाई होळकर चौकात फटाके फोडून, पेढे वाटून घोषणाबाजी करीत जल्लोष साजरा करण्यात आला.

मराठवाडा पदवीधर मतदारसंघातून डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी तर नागपूर पदवीधर मतदारसंघातून अॅड. अभिजीत वंजारी, पुणे पदवीधर मतदारसंघातून हर्षदा देशमुख-जाधव यांनी विजय मिळविल्याबद्दल महाविकास आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष उद्धवराव पाटील राजेगोरे यांच्या नेतृत्वात फटाके फोडून व पेढे

वाटून जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी महाविकास आघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे भरवून विजयाचा आनंद साजरा केला. यावेळी तालुकाध्यक्ष उद्धवराव पाटील राजेगोरे, ज्येष्ठ नेते डॉ. उत्तमराव इंगळे, तालुकाध्यक्ष सुनील वानखेडे, जिल्हा सरचिटणीस अशोकराव बुटले, अॅड. सचिन देशमुख, युवक कॉंग्रेसचे शहराध्यक्ष रवींद्र पाटील डाढाळे, तालुका उपाध्यक्ष बळीराम हड्डेकर, शिवसेनेचे अशोक डांगे, जिल्हा प्रवक्ते सुभाष लोणे, आनंदराव सूर्यवंशी, विश्वनाथ राजेगोरे, महादजी राजेगोरे, माजी जि. प. सदस्य प्रल्हादराव सोळंके, बाळासाहेब देशमुख आंबेगावकर, रमेश सूर्यवंशी, अॅड. नितीन लोणे, बालू चव्हाण, म. गौस कुरेशी, भीमराव सरोदे आदी उपस्थित होते.

'समरगंध' कवितासंग्रह 'इंदिरा संत स्मृती' राज्यस्तरीय काव्य पुरस्काराने सन्मानित

नांदेड (प्रतिनिधी)– कवयित्री डॉ. अंजली कानिंदे यांच्या पहिल्या 'समरगंध' या कवितासंग्रहाला 'इंदिरा संत स्मृती' राज्यस्तरीय काव्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विद्यानिकेतन सामाजिक व शैक्षणिक संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने २५ ऑक्टोबर रोजी कोचळेवाडी जि. सातारा येथे सकाळी ११ वाजता आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रेम आणि विरहाच्या भावविश्वाचा काव्यमय आविष्कार असलेल्या 'समरगंध' या संग्रहातील साहित्यिक योगदानाची दखल घेत डॉ. कानिंदे यांना हा सन्मान देण्यात आला. सोहळ्याचे उद्घाटन ज्येष्ठ अभिनेत्री सौ. प्रियांका शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी श्री फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सागर पडाळे, कार्यक्रमाचे आयोजक तथा विद्यानिकेतन संस्थेचे शशिकांत एकनाथ कोचळे, पत्रकार तथा संपादक सुनील रासकर, सम्राट बौद्ध जनजागृती सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा सौ. रेखा साने यांच्यासह विद्यार्थी, पालक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या खेळाडूंची विविध स्पर्धांसाठी निवड

नवीन नांदेड (प्रतिनिधी)– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत आयोजित विविध क्रीडा स्पर्धांमध्ये वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात भर घातली आहे. पॉवरलिफ्टिंग स्पर्धेतील सुवर्ण विजेतेपदासह बास्केटबॉल आणि बॉक्सिंग या खेळांमध्ये अखिल भारतीय विद्यापीठ स्तरावरील स्पर्धांसाठी निवड झाली आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि नारायणराव चव्हाण लॉ कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सी झोन पॉवरलिफ्टिंग' स्पर्धेत महाविद्यालयाच्या करण जाधव याने ७४ किलो वजन गटात प्रथम क्रमांक तर ऋषिकेश वानखेडे याने ८४ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवून दोघांनीही सुवर्ण पदकावर नाव कोरले आहे. तर प्रसाद गोरकडे याने द्वितीय क्रमांक संपादन केला. या खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट

ताकदीच्या जोरावर महाविद्यालयाच्या यशात मोलाची भर घातली. तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सेंटर झोन बास्केटबॉल स्पर्धेत वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या पल्लवी कैलास भालेराव, साक्षी दिलीप भालेराव आणि प्रेम दिलीप भालेराव या खेळाडूंची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बास्केटबॉल स्पर्धे च्या प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाली आहे.

याशिवाय, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सेंटर झोन बॉक्सिंग स्पर्धेत महाविद्यालयाचा ओमकार मारतडे याने प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय कामगिरी केली. त्याची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या निवडीमुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या सर्व यशस्वी खेळाडूंचा प्राचार्य प्रोफेसर डॉ. शेखर घुंगरवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या मेहनतीचे, नियमित सरावाचे आणि जिद्दीचे कौतुक केले. क्रीडा क्षेत्रात यश मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण सराव, शिस्त, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रम आवश्यक असल्याचे सांगून त्यांनी सर्व खेळाडूंना आगामी स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.व्ही.आर.राठोड, कार्यालयीन अधीक्षक आर. डी. राठोड, प्रा.डॉ.ए.जी.गच्चे, प्रा.डॉ. उत्तम कानवटे आदी उपस्थित होते.

या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागप्रमुख प्रा. डॉ.साहेबराव मोरे, प्रा.डॉ. राहुल सरोदे, प्रा. डॉ. महेश जाधव यांनी मार्गदर्शन केले.

नांदेड येथील जिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचे उद्घाटन; ३ नोव्हेंबरला पुरक मोहीम

नांदेड (प्रतिनिधी)– बालकांना जंतांच्या प्रादुर्भावापासून मुक्त ठेवून त्यांचे आरोग्य सुदृढ राखण्यासाठी जिल्हा रुग्णालय, नांदेड येथे मंगळवारी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचे उद्घाटन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एस. एन. पेरके यांच्या हस्ते करण्यात आले. या मोहिमेद्वारे १ ते १९ वर्षे वयोगटातील बालकांना जंतनाशक गोळ्या देण्याबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनुपमा बालाजी शिंदे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. आर. एस. बुट्टे, डॉ. लोमटे, प्रभारी परिचारिका रेखा मुंडे, परिचारिका जयश्री वाघ, आरकेएसके समुपदेशक धनश्री गुंडाळे तसेच परिचर्या विद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

जिल्हा रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात उपस्थित रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मार्गदर्शन करताना जंतांच्या प्रादुर्भावामुळे रक्तक्षय होऊ शकतो, तसेच वारंवार पोटदुखीचा त्रास उद्भवू शकतो, असे सांगण्यात आले. बालकांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दर सहा महिन्यांनी जंतनाशक गोळी देणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांना जंतनाशक गोळ्या देण्याबाबत जागरूक राहावे, असे आवाहन करण्यात आले.

राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेंतर्गत १ ते २ वर्षे वयोगटातील बालकांना अल्बेंडाझोल गोळीची अर्धी मात्रा योग्य पद्धतीने देण्यात येणार आहे, तर २ ते १९ वर्षे वयोगटातील बालकांना एक गोळी देण्यात येणार आहे.

जिल्हयातील सर्व पालकांनी आपल्या १ ते १९ वर्षे वयोगटातील बालकांना आरोग्य विभागाच्या सूचनांनुसार जंतनाशक गोळी देऊन मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एस. एन. पेरके यांनी केले आहे.

तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

घरासाठी कोणता प्रिंटर खरेदी करावा?

इंकजेट, इंक टँक की लेझर; किंमत अन् देखभालीचे पूर्ण गणित समजून घ्या...

घरातील मुलांचे शालेय प्रकल्प, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे अभ्यासाचे साहित्य, कार्यालयीन कागदपत्रे किंवा छोट्या व्यवसायातील दैनंदिन कामे... अशा विविध कारणांसाठी घरात प्रिंटर असणे आता गरजेचे झाले आहे. प्रत्येक वेळी छपाईसाठी दुकानात जाण्यापेक्षा घरातच प्रिंटर असल्यास वेळ आणि श्रमांची बचत होते. मात्र, बाजारात इंकजेट, इंक टँक आणि लेझर प्रिंटरचे अनेक पर्याय उपलब्ध असल्याने नेमका कोणता प्रिंटर खरेदी करावा, असा प्रश्न अनेकांना पडतो. प्रिंटर खरेदी करताना केवळ त्याची किंमत पाहणे पुरेसे नाही. त्याचा वापर किती होणार आहे, एका पानाच्या छपाईसाठी किती खर्च येतो आणि शाई किंवा टोनर बदलण्याचा खर्च किती आहे, याचाही विचार करणे आवश्यक आहे. त्यानुसार योग्य प्रिंटर निवडल्यास दीर्घकाळात पैशांची बचत होऊ शकते...

कमी वापरासाठी इंकजेट प्रिंटर योग्य

महिन्याला केवळ १० ते १५ पाने छापण्याची गरज असेल, तर इंकजेट प्रिंटर हा किफायतशीर पर्याय ठरू शकतो. साधारणतः २,५०० ते ४,००० रुपयांच्या दरम्यान हे प्रिंटर उपलब्ध होतात. या प्रिंटरमध्ये छपाईसाठी शाईच्या काड्यांचा (कार्ट्रिज) वापर केला जातो. एका कार्ट्रिजसाठी साधारणतः १,००० ते १,८०० रुपये खर्च येतो. त्यामुळे एका पानाच्या छपाईसाठी अंदाजे ५ ते ७ रुपये खर्च होऊ शकतो. मात्र, या प्रिंटरचा वापर दीर्घकाळ केला नाही, तर कार्ट्रिजमधील शाई सुकण्याची शक्यता असते. त्यामुळे अधूनमधून छपाई करणे आवश्यक ठरते. कमी प्रमाणात आणि अधूनमधून छपाई करणाऱ्यांसाठी हा पर्याय उपयुक्त आहे.

नियमित छपाईसाठी इंक टँक प्रिंटर फायदेशीर

विद्यार्थी, व्यावसायिक, घरातून काम करणारे कर्मचारी आणि लघुउद्योजक यांच्यासाठी इंक टँक प्रिंटर अधिक फायदेशीर ठरू शकतो. या प्रिंटरची किंमत साधारणतः ११ हजार ते १६ हजार रुपयांदरम्यान असते. सुरुवातीला या प्रिंटरसाठी अधिक पैसे खर्च करावे लागतात. मात्र, त्याच्या देखभालीचा आणि छपाईचा खर्च तुलनेने कमी असतो. यामध्ये स्वतंत्र कार्ट्रिज खरेदी करण्याऐवजी शाईच्या बाटल्यांचा वापर केला जातो. या प्रिंटरमध्ये एका कृष्णधवल पानाच्या छपाईसाठी साधारणतः १५ ते २५ पैसे, तर रंगीत पानासाठी ४० ते ५० पैसे खर्च येतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात छपाई करायची असल्यास हा पर्याय आर्थिकदृष्ट्या अधिक फायदेशीर ठरतो.

मोठ्या प्रमाणातील छपाईसाठी लेझर प्रिंटर

कार्यालयीन कागदपत्रे, बिले, पावत्या, कायदेशीर दस्तऐवज किंवा इतर मजकूरप्रधान कागदपत्रांची मोठ्या प्रमाणात छपाई करायची असेल आणि रंगीत छपाईची आवश्यकता नसेल, तर कृष्णधवल लेझर प्रिंटर खरेदी करणे योग्य ठरू शकते. या प्रिंटरची किंमत साधारणतः १२ हजार ते १८ हजार रुपयांदरम्यान असते. इतर प्रिंटरप्रमाणे यामध्ये द्रवरूप शाईऐवजी कोरड्या स्वरूपातील टोनर पावडरचा वापर केला जातो. त्यामुळे प्रिंटर अनेक महिने वापराविना ठेवला तरी शाई सुकण्याची समस्या उद्भवत नाही. नवीन टोनरसाठी साधारणतः २ हजार ते ३ हजार ५०० रुपये खर्च येतो. एका पानाच्या छपाईचा खर्च अंदाजे १.५० ते २ रुपये असतो. जलद गतीने आणि स्पष्ट अक्षरांत छपाई करण्यासाठी लेझर प्रिंटर उपयुक्त मानला जातो.

प्रिंटर खरेदी करताना या सुविधांकडे लक्ष द्या...

- » प्रिंटरची निवड करताना त्याची किंमत आणि छपाईचा खर्च याबरोबरच काही महत्त्वाच्या सुविधाही तपासून घ्याव्यात.
- » वाय-फाय सुविधा : प्रिंटरमध्ये वाय-फायची सुविधा असल्यास मोबाइल किंवा संगणकाला केबलने जोडण्याची गरज पडत नाही. थेट मोबाइल किंवा लॅपटॉपवरून छपाई करता येते.
- » स्कॅनिंगची सुविधा : महत्त्वाची कागदपत्रे, प्रमाणपत्रे किंवा इतर दस्तऐवज संगणक अथवा मोबाइलमध्ये साठवण्यासाठी स्कॅनिंगची सुविधा उपयोगी ठरते.
- » छायांकित प्रत (फोटोकॉपी) : प्रिंटरमध्ये छायांकित प्रत काढण्याची सुविधा असल्यास छोट्या-मोठ्या कामांसाठी वारंवार झेरॉक्सच्या दुकानात जाण्याची गरज भासत नाही.
- » बहुउपयोगी प्रिंटरला प्राधान्य : छपाई, स्कॅनिंग आणि छायांकित प्रत काढण्याची सुविधा एकाच यंत्रात उपलब्ध असल्यास घरगुती वापरासाठी ते अधिक सोयीचे ठरते.

कोणता प्रिंटर खरेदी करणे फायदेशीर?

एकूणच, प्रिंटर खरेदी करण्यापूर्वी आपल्या वापराचे स्वरूप निश्चित करणे महत्त्वाचे आहे. महिन्याला १० ते १५ पाने छापायची असल्यास इंकजेट प्रिंटर पुरेसा ठरतो. नियमित आणि मोठ्या प्रमाणात रंगीत तसेच कृष्णधवल छपाई करायची असल्यास इंक टँक प्रिंटर अधिक किफायतशीर आहे, तर केवळ कृष्णधवल कागदपत्रांची जलद आणि मोठ्या प्रमाणात छपाई करायची असल्यास लेझर प्रिंटरचा विचार करता येईल. त्यामुळे केवळ कमी किमतीचा प्रिंटर खरेदी करण्यापेक्षा त्याची शाई, टोनर, देखभाल आणि प्रत्येक पानामागील खर्च लक्षात घेऊन निर्णय घेणे अधिक शहाणपणाचे ठरेल.

हिवाळ्यात गिझरमुळे बसू शकते वीजबिलाची झळ!

एसीइतका वीजखर्च टाळण्यासाठी या चार गोष्टी लक्षात ठेवा...

हिवाळ्याची चाहूल लागताच घराघरांत गरम पाण्यासाठी गिझरचा वापर सुरू होतो. सकाळी आंघोळीसाठी तसेच घरातील इतर कामांसाठी गरम पाणी उपलब्ध होत असल्याने गिझर हे अत्यावश्यक उपकरण बनले आहे. मात्र, गिझरचा वापर योग्य पद्धतीने केला नाही, तर त्याचा परिणाम थेट वीजबिलावर होऊ शकतो. घरांमध्ये सामान्यतः २ हजार ते ३ हजार वॅट क्षमतेचे गिझर वापरले जातात. त्यामुळे त्यांचा वीजवापरही लक्षणीय असतो. निष्काळजीपणे गिझर सुरू ठेवल्यास हिवाळ्यात वीजबिलात मोठी वाढ होऊ शकते. मात्र, गिझरचे तापमान, वापराची वेळ आणि देखभाल याबाबत काही गोष्टींची काळजी घेतल्यास विजेची बचत करता येते. गरम पाण्याची सोय कायम ठेवून वीजबिलाचा भार कमी करण्यासाठी चार उपाय उपयुक्त ठरू शकतात...

1 गिझरचे तापमान योग्य पातळीवर ठेवा : अनेक गिझरमध्ये सुरुवातीला तापमान ६० ते ७५ अंश सेल्सिअसपर्यंत निश्चित केलेले असते. प्रत्यक्षात घरगुती वापरासाठी इतक्या जास्त तापमानाची नेहमीच आवश्यकता नसते. त्यामुळे गिझरमधील तापमान नियंत्रक (थर्मोस्टॅट) साधारणतः ४५ ते ५० अंश सेल्सिअसवर ठेवता येतो. यामुळे पाणी आवश्यक तापमानापर्यंत पोहोचल्यानंतर गिझर आपोआप बंद होण्यास मदत होते. तसेच अतिउष्ण पाण्यात थंड पाणी मिसळण्याची गरजही कमी होते. मात्र, पाण्याचे तापमान वापरकर्त्यांच्या गरजेनुसार निश्चित करावे आणि भाजण्याचा धोका टाळण्यासाठी गरम पाण्याची काळजीपूर्वक हाताळणी करावी.

2 टाइमर किंवा स्मार्ट प्लगचा वापर करा : गिझरमध्ये स्वयंचलित बंद होण्याची सुविधा (ऑटो कट) असली, तरी तो दिवसभर सुरू ठेवणे योग्य नाही. गरज नसताना गिझर सुरू राहिल्यास पाणी पुन्हा गरम करण्यासाठी वीज खर्च होत राहते. त्यामुळे गरम पाणी आवश्यक असण्याच्या काही वेळ आधीच गिझर सुरू करावा आणि पाणी गरम झाल्यानंतर तो बंद करावा. साधारणतः १५ ते २० मिनिटांत पाणी गरम होऊ शकते; मात्र प्रत्यक्ष वेळ गिझरची क्षमता, पाण्याचे सुरुवातीचे तापमान आणि वापरावर अवलंबून असतो. गिझर बंद करायचा विसरण्याची शक्यता असल्यास योग्य क्षमतेच्या १६ अँपिअर स्मार्ट प्लग किंवा टाइमरचा वापर करता येतो. त्याद्वारे गिझर सुरू आणि बंद होण्याची वेळ निश्चित करता येते. मात्र, स्मार्ट प्लग हा गिझरच्या विद्युतभारासाठी योग्य प्रमाणित असणे आवश्यक आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने तज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

3 अधिक स्टार मानांकन असलेला गिझर निवडा : नवीन गिझर खरेदी करताना त्याची किंमत आणि पाण्याची क्षमता याबरोबरच ऊर्जा कार्यक्षमतेकडेही लक्ष द्यावे. शक्य असल्यास अधिक स्टार मानांकन असलेल्या ऊर्जा कार्यक्षम मॉडेलची निवड करावी. अधिक स्टार मानांकन असलेल्या उपकरणांमुळे दीर्घकाळात वीजबचत होण्यास मदत होते. गिझरची क्षमता कुटुंबातील सदस्यांच्या संख्येनुसार निवडणेही महत्त्वाचे आहे. एक ते दोन सदस्यांच्या कुटुंबासाठी साधारणतः १५ लिटर क्षमतेचा गिझर पुरेसा ठरू शकतो. चार सदस्यांच्या कुटुंबासाठी साधारणतः २५ लिटर क्षमतेचा गिझर विचारात घेता येतो. स्वयंपाकघरात भांडी धुण्यासाठी १ ते ३ लिटर क्षमतेचा तत्काळ पाणी गरम करणारा गिझर (इन्स्टंट गिझर) उपयुक्त ठरू शकतो. मात्र, गिझरची क्षमता निवडताना पाण्याचा वापर, आंघोळीची पद्धत आणि कुटुंबाच्या गरजांचाही विचार करावा.

4 वर्षातून एकदा गिझरची देखभाल करा : अनेक भागांमध्ये पाण्यात क्षारांचे प्रमाण अधिक असते. अशा पाण्यामुळे गिझरमधील उष्णता निर्माण करणाऱ्या दांड्यावर (हीटिंग रॉड) तसेच आतील भागांवर खनिजांचे थर जमा होऊ शकतात. त्यामुळे पाणी गरम करण्याची कार्यक्षमता कमी होते आणि अधिक वीज खर्च होण्याची शक्यता असते. ही समस्या टाळण्यासाठी गिझरची वर्षातून किमान एकदा तज्ज्ञांकडून तपासणी आणि देखभाल करून घ्यावी. आवश्यकतेनुसार आतील भागांची स्वच्छता करावी. तसेच गंजण्यापासून संरक्षण करणारा ॲनोड दांडा (ॲनोड रॉड) खराब झाला असल्यास तो बदलून घ्यावा. यामुळे गिझरचे आयुष्य वाढण्यास आणि त्याची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यास मदत होते.

संगणकावर आधारित प्रत्येक नोकरीवर टांगती तलवार!

एक व्यक्ती करणार दहा जणांचे काम; ‘झोहो’चे संस्थापक श्रीधर वेम्बू यांनी सांगितले, ‘एआय’ने काय बदलेल...

कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर दिवसेंदिवस वेगाने वाढत असून, त्याचा परिणाम रोजगाराच्या स्वरूपावरही होऊ लागला आहे. भविष्यात संगणकाच्या माध्यमातून केली जाणारी कोणतीही नोकरी या तंत्रज्ञानामुळे धोक्यात येऊ शकते, असा इशारा ‘झोहो’ या सॉफ्टवेअर कंपनीचे संस्थापक श्रीधर वेम्बू यांनी दिला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने एक कुशल व्यक्ती दहा जणांइतके काम करू शकते, असे त्यांनी म्हटले आहे. मात्र, याचा अर्थ संगणकावर काम करणाऱ्या ९० टक्के कर्मचाऱ्यांचा रोजगार पूर्णपणे संपुष्टात येईल, असा होत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. सध्या इंटरनेट आणि संगणकाच्या माध्यमातून केली जाणारी अनेक कामे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने कमी वेळेत पूर्ण होत आहेत. लेखन, माहितीचे विश्लेषण, संगणकीय प्रणाली विकसित करणे, विपणन आणि इतर डिजिटल कामांमध्ये या तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. त्यामुळे काम करण्याच्या पारंपरिक पद्धतीत मोठे बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

कामकाजाच्या पद्धतीत मोठे बदल होणार

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे केवळ एखाद्या कंपनीच्या कामकाजातच नव्हे, तर देशाच्या आणि जागतिक अर्थव्यवस्थेच्या कार्यपद्धतीतही मोठे बदल घडतील, असे वेम्बू यांनी म्हटले आहे. जुन्या रोजगारांच्या जागी नवीन प्रकारची कामे निर्माण होत असताना संक्रमणाचा हा काळ अनेकांसाठी कठीण ठरू शकतो. कर्मचाऱ्यांना नवीन तंत्रज्ञान शिकावे लागेल, कौशल्यांमध्ये बदल करावे लागतील आणि कामाच्या नव्या पद्धतींशी जुळवून घ्यावे लागेल. या बदलाची प्रक्रिया काहींसाठी आव्हानात्मक आणि त्रासदायक ठरू शकते.

कामाचा वेग 25 ते 50 टक्क्यांनी वाढला

यापूर्वीही श्रीधर वेम्बू यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा सॉफ्टवेअर उद्योगावर होणाऱ्या परिणामांविषयी मत व्यक्त केले होते. त्यांच्या म्हणण्यानुसार, एआयच्या वापरामुळे सॉफ्टवेअर विकसित करण्याचा वेग सुमारे २५ ते ५० टक्क्यांनी वाढला आहे. संपूर्ण सॉफ्टवेअर तयार करण्याच्या प्रक्रियेचा विचार करता ही वाढ दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले होते. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने एखाद्या संगणकीय प्रणालीचे किंवा ॲप्लिकेशनचे प्राथमिक प्रारूप अत्यंत कमी वेळेत तयार करणे शक्य झाले आहे. मात्र, त्याचे पूर्ण विकसित उत्पादनात रूपांतर करणे, त्यातील त्रुटी दूर करणे आणि प्रत्यक्ष वापरासाठी ते सक्षम बनवणे यासाठी अद्याप मानवी कौशल्याची आवश्यकता आहे. भविष्यात उत्पादकतेमध्ये दहापट किंवा शंभरपट वाढ होण्याची शक्यता असून, असे परिवर्तन प्रत्यक्षात घडेल, असा विश्वासही वेम्बू यांनी व्यक्त केला आहे. एकूणच, कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ कामाचा वेग वाढवणारे तंत्रज्ञान राहिलेले नाही, तर रोजगाराचे स्वरूप बदलण्याची क्षमता त्यात आहे. त्यामुळे संगणकावर आधारित काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे, कौशल्ये विकसित करणे आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे भविष्यात अधिक महत्त्वाचे ठरणार आहे.

वेम्बू यांनी रोजगाराबाबत काय म्हटले?

श्रीधर वेम्बू यांनी त्यांच्या अधिकृत ‘एक्स’ खात्यावर केलेल्या पोस्टमधून कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण होणाऱ्या रोजगारविषयक आव्हानांकडे लक्ष वेधले आहे. त्यांच्या मते, संगणकाच्या माध्यमातून केली जाणारी जवळपास प्रत्येक नोकरी आता नव्या प्रकारच्या जोखमीला सामोरी जात आहे. कारण कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करणारी एक कुशल व्यक्ती दहा कर्मचाऱ्यांच्या कामाइतके काम करू शकते. मात्र, यामुळे संगणकावर काम करणाऱ्या ९० टक्के लोकांकडे कोणतेही काम उरणार नाही, असा त्याचा अर्थ काढणे चुकीचे ठरेल. उलट, कामाचा खर्च कमी झाल्यामुळे आतापर्यंत आर्थिक मर्यादांमुळे कुशल सॉफ्टवेअर अभियंते किंवा डिजिटल विपणन तज्ज्ञांची नियुक्ती करू न शकणाऱ्या कंपन्यांनाही आता अशा कर्मचाऱ्यांची सेवा घेणे शक्य होऊ शकते, असे वेम्बू यांनी नमूद केले आहे.

एक व्यक्ती दहा जणांचे काम करणार!

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे कामाचा वेग आणि उत्पादकता वाढणार आहे. पूर्वी एखादे काम पूर्ण करण्यासाठी अनेक कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासत होती. मात्र, आता योग्य कौशल्य असलेली एक व्यक्ती एआयच्या मदतीने तेच काम कमी वेळेत पूर्ण करू शकते. त्यामुळे कंपन्यांमधील मनुष्यबळाची रचना, कामाचे नियोजन आणि कर्मचारी नियुक्तीच्या पद्धतीत बदल होण्याची शक्यता आहे. या बदलामुळे काही पारंपरिक नोकऱ्यांचे स्वरूप बदलू शकते, तर काही कामांची गरज कमी होऊ शकते. त्याचवेळी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराशी संबंधित नवीन कौशल्ये आणि रोजगाराच्या संधीही निर्माण होऊ शकतात.

लातूरच्या राजेमाने बंधूंची राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड!

लातूर (प्रतिनिधी)– लातूर येथील ज्ञानप्रकाश बालविकास शैक्षणिक संकुलात शिक्षण घेणाऱ्या राजेमाने बंधूंनी विभागीय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड होण्याचा मान मिळवला आहे. १४ वर्षीय विहान निलेश राजेमाने याने १९ वर्षांखालील वयोगटातील योगाच्या 'आर्टिस्टिक सिंगल' या आव्हानात्मक प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला, तर अर्णव मुकेश राजेमाने याने १४ वर्षांखालील वयोगटातील 'इनलाइन स्केटिंग' प्रकारात विभागात द्वितीय क्रमांक मिळवला. या दोघांच्या यशामुळे ज्ञानप्रकाश संकुलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

लातूर येथे पार पडलेल्या विभागीय क्रीडा स्पर्धेत विहानने योगातील आर्टिस्टिक सिंगल प्रकारात आपल्या कौशल्याची चमक दाखवत अव्वल स्थान मिळवले. या प्रकारात संकुलातील सात खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. त्यातून विहानने प्रथम क्रमांक मिळवत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध केली. तर इनलाइन स्केटिंग प्रकारात संकुलातून एकमेव सहभागी झालेल्या अर्णवने द्वितीय क्रमांक मिळवत राज्यस्तरीय स्पर्धेत प्रवेश निश्चित केला.

राजेमाने बंधूंच्या या यशाबद्दल शैक्षणिक संकुलाचे संस्थापक सतीशजी नरहरे, मुख्याध्यापिका सविता नरहरे, उपमुख्याध्यापक राऊत, पर्यवेक्षक अशोक गुरदाळे आणि क्रीडा प्रशिक्षक प्रकाश टिमके यांनी अभिनंदन केले.

या निवडीचे उद्योजक तुकाराम पाटील, डॉ. शशिकिरण भिकाने, सोनू डगवाले, सच्चिदानंद ढगे, विवेकानंद ढगे, संतोष बिराजदार, विवेक सौताडेकर, बाबुराव जाधव, असिफ शेख, ड. दासराव शिरुरे, डॉ.रामभाऊ बोरगावकर, दयानंद पाटील, रमेश बिराजदार, सुदाम पवार, पत्रकार शशिकांत पाटील, इस्माईल शेख, कैलास मंत्री, संभाजी नवघरे, अनंत सूर्यवंशी, आदींनी अभिनंदन केले आहे. या दुहेरी यशामुळे शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातून राजेमाने बंधूंचे कौतुक होत आहे.

दुष्काळी परिस्थितीत पशुधनाला दर्जेदार आणि सुरक्षित चारा मिळणार - मंत्री पंकजा मुंडे

मुंबई (प्रतिनिधी)– दुष्काळजन्य परिस्थितीतील संभाव्य चारा टंचाईवर मात करून पशुपालकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने चारा खरेदीचे दर निश्चित केले आहेत. पशुधनासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या सुक्या चाऱ्याची कमाल आधारभूत किंमत वाहतूक खर्च वगळून प्रतिकिलो १२ रुपये, तर मुरघासाची कमाल आधारभूत किंमत वाहतूक खर्च वगळून प्रतिकिलो ८ रुपये निश्चित केली आहे, अशी माहिती पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. चाराटंचाईच्या काळात पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनांना यामुळे मदत होणार आहे.

राज्यातील खरीप हंगामातील परिस्थितीचा आढावा घेऊन आतापर्यंत एकूण ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीने अभ्यासगटाची स्थापना केली होती. या अभ्यासगटात पंकजा मुंडे सदस्य असून या अभ्यास गटाने राज्यासह इतर राज्यांमधील चारा व्यवस्थापनाच्या उपाययोजनांचा अभ्यास करून उपलब्ध चारा, संभाव्य उत्पादन आणि आगामी काळातील गरज लक्षात घेऊन अहवाल सादर केला. या अहवालाला २७ ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मदत व पुनर्वसन विभागाने जाहीर केलेल्या दुष्काळाच्या कालावधीसाठी हे दर लागू राहतील. जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन कार्यकारी समितीने अभ्यासगटाच्या अहवालातील तरतुदी आणि मदत व पुनर्वसन विभागाच्या निर्देशांनुसार चारा खरेदीची कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच वाहतुकीसाठी परिवहन आयुक्तांनी वेळोवेळी निश्चित केलेले दर लागू राहतील. चाऱ्याच्या गुणवत्तेबाबतही शासनाने निकष निश्चित केले आहेत. खरेदी करण्यात येणाऱ्या सुक्या चाऱ्यातील ओलावा कमाल १५ टक्के असावा. चारा चांगला दिसणारा तसेच आंबट किंवा कुबट वास, बुरशी, कीड आणि माती नसलेला असावा. ज्वारी आणि बाजरीच्या चाऱ्याला प्राधान्य देण्यात येणार आहे.

६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेतील नाट्यलेखन पारितोषिके जाहीर

मुंबई (प्रतिनिधी)– महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने आयोजित ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतील नवीन नाट्यसंहितांचे परीक्षण करण्यात आले असून, उत्कृष्ट नाट्यलेखनासाठी नाट्यलेखकांना पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत.

प्राथमिक फेरीतील नवीन नाट्यसंहितांच्या परीक्षणानंतर 'इम्युनिटी (द व्हॉईस ऑफ टॉलरन्स)' या नाट्यसंहितेसाठी डॉ. सोमनाथ सोनवलकर यांना प्रथम पारितोषिक जाहीर करण्यात आले असून, त्यांना रु. ६०,०००/- रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. 'लुई दागेरी ते पिकासो' या नाट्यसंहितेसाठी डॉ. श्याम शिंदे यांना द्वितीय पारितोषिक रु. ४०,०००/-, तर 'मिसेस हिटलर' या नाट्यसंहितेसाठी रोहन टिल्लू यांना तृतीय पारितोषिक रु. २०,०००/- जाहीर करण्यात आले आहे.

महाराष्ट्राला नाट्यकलेची समृद्ध आणि प्रदीर्घ परंपरा लाभली असून, राज्यस्तरीय नाट्य स्पर्धांच्या माध्यमातून विविध विषयांवरील दर्जेदार नाट्यलेखनाला प्रोत्साहन मिळते. नवीन नाट्यसंहितांच्या माध्यमातून समकालीन विषय, सामाजिक वास्तव आणि विविध मानवी पैलू रंगभूमीवर प्रभावीपणे मांडले जातात. अशा नाट्यलेखनाची दखल घेऊन नाट्यलेखकांच्या सर्जनशील योगदानाचा गौरव करणे हा या पारितोषिकांचा प्रमुख उद्देश आहे.

६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतील नवीन नाट्यसंहितांचे परीक्षण तज्ज्ञ परीक्षकांकडून करण्यात आले. त्यातून उत्कृष्ट लेखन, आशय, मांडणी आणि नाट्यगुणांचा विचार करून वरील नाट्यसंहितांची पारितोषिकांसाठी निवड करण्यात आली आहे. या पारितोषिकांमुळे नाट्यलेखकांना प्रोत्साहन मिळून मराठी रंगभूमीसाठी दर्जेदार आणि आशयपूर्ण नवीन नाट्यलेखनाला चालना मिळणार आहे.

ही स्पर्धा सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. महाराष्ट्राच्या समृद्ध नाट्यपरंपरेचे जतन, संवर्धन आणि विकास करण्यासोबतच नव्या पिढीतील नाटककार, कलाकार, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञांना प्रोत्साहन देण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत विविध नाट्यविषयक स्पर्धा व उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.

या पारितोषिकप्राप्त नाट्यसंहितांचे लेखक आणि त्यांच्या सर्जनशील लेखनाचा गौरव 'नाट्यगौरव' राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभ सोमवार, २ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता यशवंत नाट्यमंदिर, माटुंगा, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. या समारंभास नाट्यलेखक, कलाकार, दिग्दर्शक, रंगकर्मी तसेच नाट्यरसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पारितोषिकप्राप्त कलावंतांचा गौरव आणि मराठी रंगभूमीच्या समृद्ध परंपरेचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे.

पान १ वरून...

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे...

हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, विधानपरिषद आमदार हेमंत पाटील, आमदार राजेश पवार, बाबुराव कोहळीकर, प्रतापराव पाटील चिखलीकर, भीमराव केराम, जितेश अंतापूरकर, डॉ. तुषार राठोड, आनंदराव पाटील बोंढारकर, ॲड. जयाताई चव्हाण यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी चारा वाटप करण्यात येणार आहे. तसेच पाण्याच्या टँकरचा प्रारंभ करण्यात येईल. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील गरजू विद्यार्थिनींना सायकली, तर विधवा महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी शिलाई मशीनचे वाटप केले जाणार आहे. दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना आधार देण्यासोबतच महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे आणि विद्यार्थिनींच्या शिक्षणाला हातभार लावणे, हा या उपक्रमांचा उद्देश आहे.

वाडी (बु.) येथे उभारण्यात आलेल्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामुळे नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघासह परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत. रुग्णालयाच्या मुख्य इमारतीचे लोकार्पण होणार असून, याच परिसरात नर्सिंग महाविद्यालयाची मुख्य इमारत आणि नर्सेस वसतिगृहाच्या बांधकामाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. तसेच रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासी इमारतीच्या बांधकामाचाही शुभारंभ होणार आहे.

या कार्यक्रमात रा.म.मा.-७५२ आयपासून चोंडी, कुरुंदा, मालेगाव आणि तरोडा नाका या मार्गाशी संबंधित रस्त्याच्या कामाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. पूर्णा रोड ते मालेगाव रोड ते हिंगोली रोड या नांदेड शहर उत्तर बाह्यवळण रस्त्याचे तसेच नांदेड शहर पश्चिम बाह्यवळण रस्त्याचेही लोकार्पण होणार आहे.

याशिवाय शासकीय विश्रामगृह, पावडेवाडी नाका, मोर चौक ते छत्रपती चौक या मार्गावरील रामा-६१ च्या लिंक रोडच्या डांबरी नूतनीकरणाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. नांदेड शहर पश्चिम बाह्यवळण रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपुलाच्या पोहोचमार्गासह बांधकामाचे भूमिपूजनही होणार आहे. या कामांमुळे शहरातील वाहतूक व्यवस्था आणि परिसरातील दळणवळण अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या पुढाकारातून नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात आरोग्य, रस्ते आणि पायाभूत सुविधांशी संबंधित विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांसाठी राज्य शासनाकडून निधी उपलब्ध झाल्याने मतदारसंघातील विकासाला गती मिळत असल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. विकासकामांसोबतच दुष्काळग्रस्त शेतकरी, महिला आणि विद्यार्थिनींना मदतीचा हात देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

चारा परराज्यात पाठविण्यास बंदी, राज्य सरकारचा महत्त्वाचा निर्णय!

मुंबई (प्रतिनिधी)– राज्यातील चारा परराज्यात पाठवण्यावर कायदेशीर बंदी घालण्यात आली असून, चाऱ्याचा वापर बायोफ्युएल किंवा वीजनिर्मितीसारख्या कामांसाठी करण्यास पूर्णपणे प्रतिबंध करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत आणि अभ्यासगटाच्या शिफारसींनुसार हे निर्णय घेण्यात आले. याशिवाय, दुष्काळग्रस्त भागात उभारल्या जाणाऱ्या चारा छावण्यांमध्ये होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी बायोमेट्रिक, क्यूआर कोड आणि २४ तास सीसीटीव्हीची हायटेक डिजिटल नजर ठेवण्यात येणार आहे. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे.

दुष्काळाच्या काळात चाऱ्याचा काळाबाजार रोखून शेतकऱ्यांची लूट थांबवण्यासाठी शासनाने दर निश्चित केले आहेत. त्यानुसार सुक्या चाऱ्यासाठी कमाल १२ रुपये प्रति किलो आणि मुरघासासाठी कमाल ८ रुपये प्रति किलो असा आधारभूत दर निश्चित करण्यात आला आहे. (यात वाहतूक खर्च समाविष्ट नाही). तसेच चाऱ्याची टिकावू क्षमता पाहता शक्यतो सुका चारा खरेदी करण्याला प्राधान्य दिले जाईल. शासन निर्णयानुसार, 'जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन समिती'चे नामकरण बदलून 'जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन संनियंत्रण व आढावा समिती' असे करण्यात आले असून, या समितीच्या अध्यक्षपदी आता संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री राहतील. तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली 'जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन कार्यकारी समिती' गठीत केली जाईल. साखर कारखान्यांसोबत समन्वय साधून उसाचे वाढे, बगॅस आणि मळी आवश्यकतेनुसार उपलब्ध करून दिली जाईल.

पान १ वरून...

वाडी बु. येथील रूग्णालयास...

शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनमंतराव राजेगोरे, कॉंग्रेसचे शहराध्यक्ष गफार अब्दुल, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, राष्ट्रवादीचे रंगनाथ वाघ, सुभाष कदम, बाजार समितीचे संचालक नाना पोहरे, सत्यजित भोसले, माजी नगरसेवक नवल पोकर्णा, राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष धनंजय सूर्यवंशी, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दीपक पावडे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. हंसराज वैद्य, डॉ. संजय कदम, छावाचे प्रदेश कार्याध्यक्ष तानाजी हुस्सेकर, शहर राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष तातेराव पाटील आलेगावकर, रिपाईचे जिल्हाध्यक्ष भगवान ढगे, भाजपचे अरूण पोपळे, रमेश पावडे, संदीप तरोडकर, पंडित पवळे, विठ्ठल डक, अशोक गच्चे यांच्यासह आदीजणांची उपस्थिती होती.

यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले की, पद्मश्री शामरावजी कदम यांचे सहकार क्षेत्रात मोठे योगदान होते. राज्यामध्ये उपजिल्हा रूग्णालयाला नानासाहेब, धर्माधिकारी अशा महान व्यक्तींची नावे दिली आहेत. त्यामुळे नांदेड वाडी येथील उपजिल्हा रूग्णालयास पद्मश्रींचे नाव द्यायला पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, आरोग्यमंत्री आबिटकर, मेघनाताई बोर्डीकर यांची भेट घेणार आहे. पद्मश्रींचे नाव देण्यासाठी माझा पुढाकार आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच खा. नागेश पाटील आष्टीकर यांचाही पाठिंबा असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. माजी मंत्री माधवराव पाटील किन्हाळकर यांनीही पद्मश्रींचे नाव दिले पाहिजे, असे विस्तृत मत व्यक्त केले. माजी आ. हनमंत पा. बेटमोगरेकर, कॉंग्रेसचे गफार, शिवसेनेचे भुजंग पाटील, माजी आ. रोहिदास चव्हाण आदीजणांनी यावेळी मत व्यक्त केले.यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवारचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर यांनी प्रारंभी पद्मश्रींनी केलेली कामे आणि दवाखान्याला नाव देणे का आवश्यक आहे, या संबंधी विस्तृत माहिती दिली. यावेळी मोठ्या संख्येने सर्व पक्षातील पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते. दि. ३१ ऑक्टोबर रोजी सदरील मागणीचे निवेदन सकाळी १० वाजता जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांना दिले जाणार आहे.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाला १३ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ; अंतिम मतदार यादी ३० नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार

मुंबई (प्रतिनिधी)– महाराष्ट्रातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेला भारत निवडणूक आयोगाने मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार मतदार यादीतील नावांबाबतचे दावे आणि हरकती दाखल करण्याची मुदत आता १३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच दावे आणि हरकतींच्या नोटीस टप्प्यातील कार्यवाही व त्यांचा निपटारा करण्यासाठी २५ नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली असून, अंतिम मतदार यादी ३० नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार, दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी १३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत असेल. नोटीस टप्पा आणि दावे-हरकतींचा निपटारा २५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर ३० नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल.

महाराष्ट्रासह १९ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये १ ऑक्टोबर २०२६ ही पात्रता तारीख निश्चित करून विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रात ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. मतदारांना आपले नाव, तपशील तसेच मतदार यादीतील नोंदी तपासून आवश्यक दावे व हरकती दाखल करण्यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लॅबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

Change In Name

My old Name is **PARVEEN BEGUM** Which now I am Changing as New Name **PARVINSULTANA NIZAMODDIN SHAIKH** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: W/0. NIZAMODDIN SHAIKH Rahmat Nagar, Degloor Naka Nanded, Maharashtra 431604 Mo.No.7448035582

Change In Name

My old Name is **SHAIKH AIJAJ KHAJAMIYA** Which now I am Changing as New Name **SHAIKH AIJAS KHAJAMIYA** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: SHAIKH KHAJAMIYA H.No.39, Near Water Tank, Wajegaon, Nanded 431602 Mo.No. 9552742574

जाहिरप्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश क.स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३९. २०२६

अर्जदार :
०१. विनाबाई भ्र. बाबुराव शिंदे , वय – ६५ वर्षे, धंदा –घरकाम,
०२. दिपक पि.बाबुराव शिंदे , वय – ४६ वर्षे, धंदा – शेती ,
०३. कपिल पि.बाबुराव शिंदे , वय – ४२ वर्षे, धंदा – शेती ,
वरील तिघे रा. केसराळी ता.बिलोली. जि. नांदेड
०४. दिपिका भ्र. व्यंकटराव थडके , वय – ४४ वर्षे, धंदा – घरकाम ,
रा. घर नं.५१/मालेगांव रोड अयोध्यानगरी, तरोडा खुर्द नांदेड जि.नांदेड.

पुढील तारीख – २०.११.२०२६

विरुध्द.

गैरअर्जदार: निरंक .

विषय– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार ह्यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, **मयत बाबुराव सटवाजी शिंदे** यांचे कायदेशीर वारस आहेत. **मयत बाबुराव सटवाजी शिंदे यांचे अर्जदार क्र १ ही त्यांची पत्नी असून अर्जदार क्र २ ते ४ हे त्यांचे अपत्ये आहेत. मयत बाबुराव सटवाजी शिंदे यांचा मृत्यू दिनांक ०४/०९/२०२६ रोजी रा. केसराळी ता.बिलोली. जि. नांदेड येथे झाला.** अर्जदार ह्यांना **मयत बाबुराव सटवाजी शिंदे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **सदर मयत बाबुराव सटवाजी शिंदे** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **सदर मयत बाबुराव सटवाजी शिंदे** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत बाबुराव सटवाजी शिंदे** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत बाबुराव सटवाजी शिंदे**यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयत **बाबुराव सटवाजी शिंदे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/ १० /२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर.,
बिलोली

क. लिपीक
दिवाणी न्यायालय व. स्तर.,
बिलोली

जाहीर प्रगटन

मौजे जोशी सांगवी ता. लोहा जि. नांदेड हद्दीतील शेत गट क्र. ३५० एकूण क्षेत्रफळ १ हे.६० आर. पैकी ०.७८ आर शेतजमीन राजू तुळशीराम खेडकर रा. खेडकरवाडी ता. लोहा जि. नांदेड यांचेकडून १) दिनेश बालाजीराव गरूडकर रा. जय हनुमान सोसायटी, धनेगाव ता.जि. नांदेड २) सुरेखा आत्माराम यलगंदलवार रा. धनेगाव ता.जि. नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

शेतजमिनीची चतु:सिमा- पूर्वेस - मारोती भाऊराव शिंदे यांचे शेत, पश्चिमेस - शंकर धर्माजी मोरे यांचे शेत, दक्षिणेस - काकांडी ते शिराढोण रोड व उत्तरेस - नदी.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील शेतजमिनीबद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत १) दिनेश बालाजीराव गरूडकर व २) सुरेखा आत्माराम यलगंदलवार यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार
१) दिनेश बालाजीराव गरूडकर
रा. जय हनुमान सोसायटी, धनेगाव ता.जि. नांदेड
२) सुरेखा आत्माराम यलगंदलवार
रा. धनेगाव ता.जि. नांदेड

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशील मौजे- वडगांव (बु.) (५४४५६०) , ता. हादगाव, जि. नांदेड, येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या शेत-जमिनी ह्या सदर जमिनींचे विद्यमान मालकांकडून भाडेतत्त्वावर २८ वर्षे ११ महिने घेण्याकरिता बोलणी करीत असून, त्याबाबत सदर मिळकती निर्वेध व बोजा-रहित असल्या बाबत मालकी हक्क तपासणी अहवाल (टायटल व सर्च रिपोर्ट) करून घेण्यासाठी आम्हाला विनंती केल्यावरून, प्रस्तुत नोटिशीद्वारे आवाहन करण्यात येते की, जर कोणाही व्यक्ती, एकत्रित / अविभाजित कुटुंब किंवा त्याचे घटक सदस्य, बँक व इतर वित्तीय संस्था, कंपनी वा सहकारी संस्था किंवा कोणीही सावकार, कर्जदाते, किंवा इतर कोणाही त्रयस्थ इसमाचा सदर मिळकतींबाबत कुठलाही हक्क, शीर्षक, हिस्सा, ताबा, वारसा-अधिकार, कौटुंबिक व्यवस्था / सेटलमेंट, दावा किंवा मागणी, बोजा, प्रतीकात्मक ताबा, अधिग्रहण/ विभाजन अधिकार असल्यास किंवा सदर मिळकतीबाबत कुठल्याही व्यक्तीने वर नमूद जमीन मालक किंवा त्यांचे कुटुंबियांपैकी कोणाही बरोबर खरेदी-विक्री, विकसन, कुलमुखत्यार, अभिहस्तांतरण, समजपत्र, ट्रस्ट, रखरखाव, भाडेकरार, वहिवाटीचा परवाना, ईझमेंटरी राइट्स अथवा गहाण, तारण, इ. कुठल्याही स्वरूपाचा व्यवहार केला असल्यास, तसेच कोणत्याही न्यायालयीन आदेश/ मनाई हुकुम, लीस पेन्डन्स, जमिनीवरील आरक्षण इ. बाबत कोणाला काही माहिती असल्यास किंवा त्याला अनुसरून जर कोणाचाही प्रस्तुत व्यवहारास आक्षेप असल्यास, त्यांनी प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **७ (सात) दिवसाचे** आत आमचे खालील पत्यावर लिखित स्वरुपात व योग्य त्या कागदपत्रे व पुराव्यानिशी खात्री करून द्यावी, अन्यथा सदर मिळकतीवर इतर कोणाचाही हक्क-हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून, योग्य ती सर्व शहानिशा करून सदर मिळकतींचे मालकी हक्कांबाबत तपासणी अहवाल आमचे अशिलांस सादर केला जाईल. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही ह्याची नोंद घ्यावी. कळावे,

परिशिष्ट (मिळकतींचे वर्णन)

मौजे- वडगांव (बु.) (५४४५६०), ता. हादगाव , जि. नांदेड, येथील खालील नमूद शेत-जमिनी, त्यामधील तदंगभूत पीक, तृण-काष्ठ, फळझाडे, विहीरी, जलस्त्रोत, बांधकाम, चीजवस्तू व वहिवाटीचे हक्कांसह: -

गाव वडगांव (बु.)	गट क्र.	(खाता क्र.)	मालकाचे नाव	क्षेत्रफळ (Hector Ares)
वडगांव (बु.)	१९२	९४२	संदीप नागोराव वाठोरे	० हे ८० आर
वडगांव (बु.)	१९२	९४१	जनार्दन नागोराव वाठोरे	० हे ८० आर
वडगांव (बु.)	१९२	७४	गयाबाई नागोराव वाठोरे	० हे ४५ आर
वडगांव (बु.)	१९३	१६३	गयाबाई नागोराव वाठोरे जनार्दन नागोराव वाठोरे दयाल नागोराव वाठोरे संदीप नागोराव वाठोरे सुजाता श्रीरंग साळवे ज्योति हनुमान दवणे	० हे ८४ आर
वडगांव (बु.)	१९३	९४३	दयाळ नागोराव वाठोरे	० हे ८० आर
वडगांव (बु.)	१९०	५४६	रत्नमालाबाई भारत वाठोरे	० हे ५० आर
वडगांव (बु.)	१९०	२४६	भगवान चादू वाठोरे	० हे ७३ आर
वडगांव (बु.)	१९०	३१३	सरजाबाई लक्ष्मण वाठोरे दीपक लक्ष्मण वाठोरे सतीश लक्ष्मण वाठोरे आम्रपाली दयानंद बाहात्रे	० हे २० आर
वडगांव (बु.)	१८९	९४४	भारत चांदू वाठोरे	१ हे ३१ आर

जाहिरात प्रसिद्ध दिनांक: ३० -१० -२०२६
वकिलामार्फत: Adv. ध्रुव भावे
कार्यालयाचा पत्ता: ऑफिस क्र ४, ३ रा मजला, साई कॉम्प्लेक्स, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११००४
संपर्क क्रमांक: ९१५८४८१०८८

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308

विष्णुपुरी प्रकल्पाचे पाणी केवळ पिण्यासाठी आरक्षित

◆ रब्बी सिंचनासाठी पाणी मिळणार नाही ◆ शेतकऱ्यांनी कालव्याच्या पाण्याच्या भरवशावर रब्बी पिकांची पेरणी करू नये; जलसंपदा विभागाचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी)– अपुऱ्या पर्जन्यमानामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठा सन २०२६-२७ या वर्षासाठी ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित करण्यात आला आहे. त्यामुळे चालू वर्षात प्रकल्पाच्या कालव्याद्वारे रब्बी हंगामासाठी सिंचनाचे पाणी उपलब्ध करून देणे शक्य होणार नाही. शेतकऱ्यांनी कालव्याच्या पाण्यावर अवलंबून राहून रब्बी पिकांची पेरणी किंवा लागवड करू नये, असे आवाहन नांदेड पाटबंधारे विभाग (उत्तर) यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने ५ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार विष्णुपुरी प्रकल्पातील सर्व पाणीसाठ्यातून उपलब्ध होणारे पाणी पिण्यासाठी आरक्षित करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांनी नांदेड महानगरपालिका तसेच ग्रामीण पाणीपुरवठा योजनांसाठी या प्रकल्पातील पाणी आरक्षित ठेवले आहे.

या निर्णयामुळे सन २०२६-२७ मध्ये विष्णुपुरी प्रकल्पाच्या कालव्याद्वारे रब्बी हंगामातील पिकांना सिंचनासाठी पाणी सोडणे शक्य होणार नाही. त्यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी कालव्याद्वारे प्रवाही पाणी उपलब्ध होईल, या अपेक्षेने रब्बी पिकांची पेरणी, लागवड अथवा अन्य पीक उत्पादनाची कामे करू नयेत. कालव्याच्या पाण्याच्या अपेक्षेने पीक पेरणी किंवा लागवड केल्यास होणाऱ्या संभाव्य नुकसानीची जबाबदारी जलसंपदा विभागाची राहणार नाही, असेही विभागाने स्पष्ट केले आहे.

दुष्काळसदृश परिस्थितीत उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करणे आणि नागरिकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन विष्णुपुरी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील सर्व शेतकरी बांधवांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून जलसंपदा विभागास सहकार्य करावे, असे आवाहन नांदेड पाटबंधारे विभाग (उत्तर) चे कार्यकारी अभियंता सी. आर. बनसोड यांनी सार्वजनिक निवेदनाद्वारे केले आहे.

विशेष लोकअदालतीचे २१ नोव्हेंबरला आयोजन

नांदेड (प्रतिनिधी)– महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नरेंद्र के. ब्रह्मे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये २१ नोव्हेंबर २०२६ रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या विशेष लोकअदालतीमध्ये परक्राम्य लेख अधिनियम, १८८१ च्या कलम १३८ अंतर्गत धनादेश अनादर (चेक बाऊन्स) संदर्भातील पात्र प्रलंबित प्रकरणे तसेच न्यायालयात दाखल होण्यापूर्वीची प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात येणार आहेत.

या अनुषंगाने संबंधित पक्षकारांना आपली प्रकरणे तडजोडीने मिटविण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांसाठी संबंधित न्यायालयात, तर दाखलपूर्व प्रकरणांसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड किंवा जवळच्या तालुका न्यायालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून तडजोड करता येईल. अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड किंवा जवळच्या न्यायालयातील तालुका विधी सेवा समितीशी संपर्क साधावा. या विशेष लोकअदालतीचा संबंधित पक्षकारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद देशपांडे यांनी केले आहे.

मंदिरातील देवांचे मुखवटे, दागिने चोरणारे दोन अट्टल गुन्हेगार जेरबंद; ५ गुन्हे उघड, ४.७४ लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात वाढत्या मंदिर चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा नांदेडने मोठी कारवाई केली आहे.

विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत मंदिरांमधील देवांचे मुखवटे, दागिने आणि दानपेट्या फोडून चोरी करणाऱ्या दोन रेकॉर्डवरील गुन्हेगारांना ताब्यात घेऊन कंधार, हिमायतनगर, तामसा, भाग्यनगर आणि कुंटूर येथील एकूण ५ चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. आरोपींकडून सोन्या- चांदीचे दागिने, रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण ४ लाख ७४ हजार ८४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. २८ ऑक्टोबर रोजी एलसीबीचे पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे व त्यांचे पथक पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, मंदिरात चोरी करणारे दोन आरोपी काळ्या रंगाच्या पल्सर (MH-२४-C-९१४७) मोटारसायकलवरून लातूर-नांदेड रोडने लोह्याकडे येत असून त्यांच्याकडे विक्रीसाठी चोरीचे दागिने आहेत. या माहितीच्या आधारे पथकाने दोन पंचांना सोबत घेऊन अहमदपूर-नांदेड रोडवर, लांडगेवाडी जवळील दिव्या हॉटेल समोर सापळा रचला. वर्णनाप्रमाणे येणारी मोटारसायकल अडवून दोघांना ताब्यात घेण्यात आले.

त्यांची नावे समीर अहमद अली सय्यद (वय २५, रा. बिस्ती गल्ली, अहमदपूर, जि. लातूर) आणि हातिक उर्फ आतिक आजम सय्यद (वय ३९, रा. खाटीक गल्ली, अहमदपूर) अशी आहेत.

पंचासमक्ष अंगझडतीत आरोपी समीरकडे कॅरीबॅगमध्ये चांदीचे दागिने व रोख रक्कम, तर हातिककडे सोन्याचे दागिने व रोख रक्कम मिळून आली. सखोल चौकशीत त्यांनी मागील नऊ महिन्यांपासून नांदेड जिल्ह्यातील मंदिरांमध्ये चोरी केल्याची कबुली दिली. पोलीस अभिलेख तपासणीत खालील गुन्हे उघड झाले आहेत. कंधार - ३२९/२०२६ कलम ३०५(अ), ३३१(४), ३(५), हिमायतनगर - २३१/२०२६ कलम ३३१(४), ३०५, ३२४(४), तामसा - ४७/२०२६ कलम ३३१(२), ३०५, ३(५), भाग्यनगर - ४२३/२०२६ कलम ३०५(३) आणि कुंटूर - १५/२०२६ कलम ३३१(४) दोन्ही आरोपींना जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कारवाईसाठी कंधार पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यांतील पशुधनाची 'भारत पशुधन' प्रणालीवर नोंदणी करा!

◆ चारा, पाणी, पशुवैद्यकीय उपचार व शासकीय मदत योग्य पशुपालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पशुसंवर्धन विभागाचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी)– राज्यातील ३०४ तालुक्यांमध्ये घोषित करण्यात आलेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनाचे संगोपन व संवर्धन करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने काटेकोर नियोजन केले आहे. दुष्काळाच्या काळात पशुधनासाठी चारा, चारा बियाणे, चारा ठोंबे, वैद्यकीय उपचार तसेच इतर आवश्यक सेवा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाची 'भारत पशुधन' प्रणालीवर नोंदणी अद्ययावत करावी, तसेच नवीन पशुधनाचे टॅगिंग करून त्याची नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.

दुष्काळी परिस्थितीत शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजना, मदतकार्य व सवलतींचा लाभ पारदर्शकपणे आणि थेट पात्र पशुपालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पशुधनाची भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी असणे आवश्यक आहे. यासाठी पशुपालकांनी आपल्या परिसरातील नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधून पशुधनाची अचूक नोंदणी करून घ्यावी. तसेच नवीन पशुधनाच्या कानात १२ अंकी ओळख क्रमांकाचा बिल्ला (टॅग) बसवून त्याची नोंद प्रणालीवर करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी.

दुष्काळी परिस्थितीत पशुधनाचे संगोपन व संवर्धन ही पशुसंवर्धन विभागाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. पशुपालकांनी आपल्या पशुधनाची अचूक नोंदणी व टॅगिंग 'भारत पशुधन' प्रणालीवर करून घ्यावे. या डिजिटल नोंदणीमुळे आपत्कालीन परिस्थितीत चारा बियाणे, चारा ठोंबे व इतर आवश्यक मदत पात्र पशुपालकांपर्यंत अचूकपणे पोहोचविणे शक्य होईल. त्यामुळे सर्व पशुपालकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

एल निनोच्या पार्श्वभूमीवर चारा व्यवस्थापनाचे नियोजन

◆ युरिया प्रक्रियेद्वारे चाऱ्याची पौष्टिकता वाढविण्याचे प्रात्यक्षिक ◆ मृदासंवर्धन आणि संतुलित खत वापराबाबत जनजागृती

नांदेड (प्रतिनिधी)– एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे उद्‌भवू शकणाऱ्या चारा टंचाईवर मात करण्यासाठी पशुधनाकरिता वर्षभर सकस चारा उपलब्ध व्हावा, तसेच जमिनीचे आरोग्य जपण्यासाठी मृदासंवर्धन आणि संतुलित खत वापराबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने कृषी विज्ञान केंद्र, सगरोळी, नांदेड-२ येथे विशेष मार्गदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भारतीय कृषी अनुसंधान परिषद अंतर्गत कृषी तंत्रज्ञान अनुप्रयोग संशोधन संस्था, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात १०३ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २४ व्या हप्त्याच्या वितरणाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे

थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे निर्माण होणाऱ्या चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर चारा प्रक्रिया व साठवणूक तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. कृषी विज्ञान केंद्राचे पशुविज्ञान विषय विशेषज्ञ डॉ. निहाल मुल्ला यांनी वाळलेल्या चाऱ्यावर युरिया प्रक्रिया करून त्याची पौष्टिकता वाढविणे आणि त्याची योग्य पद्धतीने साठवणूक करण्याचे तंत्र शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून समजावून सांगितले. तसेच हंगामात उपलब्ध होणाऱ्या हिरव्या चाऱ्यापासून मुरघास तयार केल्यास टंचाईच्या काळातही पशुधनासाठी सकस चारा उपलब्ध ठेवता येतो, असे त्यांनी सांगितले.

खेत बचाओ अभियानातून मृदासंवर्धनाचा संदेश

केंद्र शासनाच्या खेत बचाओ अभियानांतर्गत जमिनीचे आरोग्य जपणे, मृदासंवर्धनाच्या उपाययोजना राबविणे आणि माती परीक्षणानुसार संतुलित खतांचा वापर करणे याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी रासायनिक खतांचा गरजेनुसार वापर, सेंद्रिय निविष्ठांचा अवलंब आणि मृदासंवर्धनाच्या उपाययोजनांचे महत्त्व यावर यावेळी भर देण्यात आला.

या कार्यक्रमास उपविभागीय कृषी अधिकारी विठ्ठल गीते, बिलोलीचे तालुका कृषी अधिकारी विवेक गुडूप, नांदेड येथील आत्माचे उपप्रकल्प संचालक अर्चना गुंजकर, पशुधन विकास अधिकारी विकास गड्डेवाड यांच्यासह कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते.

शासकीय योजनांची माहिती, चारा प्रक्रिया व साठवणुकीचे प्रत्यक्ष तंत्रज्ञान आणि मृदासंवर्धनाबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन यामुळे हा कार्यक्रम शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरला.

हदगावात काँग्रेस आक्रमक: निवडणूक आयुक्तांच्या बडतर्फीसह दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाखांच्या मदतीची मागणी

हदगाव (प्रतिनिधी)– माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाच्या वतीने हदगाव शहरात 'मत वाचवा, देश वाचवा' अभियानांतर्गत भव्य दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार येथून रॅलीला उत्साहात सुरुवात झाली. काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने दुचाकींसह सहभागी झाले होते. हातात काँग्रेसचे तिरंगी ध्वज घेऊन कार्यकर्त्यांनी विविध घोषणांच्या माध्यमातून आपल्या मागण्यांकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधले.

रॅलीच्या समारोपानंतर माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या नेतृत्वाखाली हदगावच्या तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर आक्षेप नोंदवत, कथित त्रुटींच्या पार्श्वभूमीवर त्यांना तातडीने पदावरून बडतर्फ करण्याची मागणी करण्यात आली.

दरम्यान, हदगाव तालुक्यासह परिसरात पावसाअभावी निर्माण झालेली कोरड्या दुष्काळाची परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून, शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने दुष्काळग्रस्त परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत तातडीने मंजूर करावी, अशी आग्रही मागणी निवेदनातून करण्यात आली.

शेतकऱ्यांना या संकटातून सावरण्यासाठी केवळ आश्वासनांऐवजी ठोस आर्थिक मदत देण्याची गरज असून, शासनाने निवेदनातील मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भूमिका काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी मांडली.

या दुचाकी रॅलीत माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर, काँग्रेस जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, तालुकाध्यक्ष किशोर पाटील, खादीर खान, माजी जिल्हा परिषद सदस्य पंजाबराव पाटील हरडफकर, नगरसेवक तथा गटनेते अमित अडसूळ, नगरसेवक संदीप शिंदे, दिलीप चव्हाण, आनंदराव मस्के, शेतकरी नेते आत्माराम पाटील वाटेगावकर, नागोराव सूर्यवंशी, सीताराम पाटील यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संजय आनेवार यांचे निधन

नांदेड (प्रतिनिधी)– नांदेड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे निदेशक संजय नारायणराव आनेवार यांचे अल्पशा आजाराने उपचारादरम्यान निधन झाले.

ते कृषीक्रांती सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष नारायणराव आनेवार यांचे ज्येष्ठ चिरंजीव, तर संदीप व डॉ. सचिन आनेवार यांचे बंधू होत. त्यांच्या पश्चात आई-वडील, दोन भाऊ, पत्नी व दोन मुले असा परिवार आहे.

पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाची परभणीमध्ये अवैध वाळूविरुध्द कारवाई

नांदेड (प्रतिनिधी)– परभणी जिल्ह्यातील अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरुद्ध मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत होत्या. सदर अवैध वाळू विरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकास गंगाखेड पोलीस ठाणे हद्दीतील वझुर शिवारात पाठविले होते.

सदर पथकाने, दि. २९ ऑक्टोबर रोजी वझुर शिवारातील वाळू धक्क्यावर कारवाई केली असता, सदर ठिकाणी इंजिन बोटच्या सहाय्याने नदी पात्रातून वाळू उपसा होत असल्याचे व सदर वाळू तराफ्याचे साह्याने नदीकिनारी आणली जात असल्याचे निदर्शनास आले. सदर कारवाईत पथकाने, वाळूने भरलेले (४) तराफे, एक हायवा, एक टिप्पर, JCB मशीन व नदीपात्रातून बाहेर काढून ठेवलेली (३०) ब्रास वाळू, असा एकूण ७९ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमूद प्रकरणात गंगाखेड पोलीस ठाणे येथे गुरनं ७०५/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. सह कलम ४८ (७), ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसूल संहितान्वये गुन्हा नोंदविला आहे.

पोलिसांची सोनाईनगरमधील कुंटणखान्यावर कारवाई; ३ पीडितांची सुटका, ६ आरोपींविरुद्ध गुन्हा

नांदेड (प्रतिनिधी)– शहरातील अनैतिक मानवी व्यापाराला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून गुन्हे शाखेअंतर्गत असलेल्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने दि. २९ ऑक्टोबर रोजी सोनाईनगर येथील कुंटणखान्यावर छापा टाकून कारवाई केली आहे.

पोलीस पथकाला खात्रीशीर माहिती मिळाली होती की, शिवसाई अपार्टमेंट, सोनाई नगर येथे पीडित महिलांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून बळजबरीने

वेश्या व्यवसाय करून घेतला जात आहे. या माहितीच्या आधारे प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी शासकीय पंचासमक्ष एका सामाजिक कार्यकर्त्याला बोगस ग्राहक म्हणून त्या ठिकाणी पाठवले. बोगस ग्राहकाने वेश्यागमनासाठी व्यक्ती निश्चित करताच पोलिसांना ठरल्याप्रमाणे इशारा केला. इशारा मिळताच पोलीस पथकाने छापा टाकला.

छाप्यात घटनास्थळी आरोपी रणजितकौर अजय तिवारी (वय ५०, रा. सोनाईनगर), धरमसिंग महिंद्रसिंग अलग (वय ३१, रा. सोनाई नगर), दत्ता हरी उमरे (वय ४०, रा. विद्युतनगर), आशिष साहेबराव कीर्तने (वय २५, रा. सर्वोदयनगर), मनोज नामदेव सूर्यवंशी (वय २२, रा. चैतन्यनगर) आणि महेश राजू वाघमारे (वय २५, रा. चिखलवाडी) हे मिळून आले.

दुचाकी-मोबाईल चोरट्यांची आंतरजिल्हा टोळी जेरबंद; २.३७ लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात वाढत्या मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातून दुचाकी व मोबाईल चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करून एका आरोपीसह दोन अल्पवयीन बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याकडून ४ चोरीच्या मोटारसायकली आणि १ मोबाईल असा एकूण २ लाख ३७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. २८ ऑक्टोबर रोजी एलसीबीचे सहायक पोलीस निरीक्षक गोविंद खैरे व त्यांचे पथक नांदेड शहर व इतवारा भागात गुन्ह्यातील आरोपींचा शोध

घेत गस्त घालत होते. त्यादरम्यान देगलूर नाका परिसरात असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, तीन संशयित व्यक्ती चोरीची बजाज पल्सर २२० मोटारसायकल घेऊन बटाटा- कांदा मार्केट रोडवरील शासकीय मलशुद्धीकरण केंद्रासमोर थांबलेले आहेत.

माहितीच्या आधारे पथकाने दोन पंचांना सोबत घेऊन त्या ठिकाणी छापा टाकून तिघांना ताब्यात घेतले. त्यांची नावे मोहम्मद रेहान उर्फ रिझवान उर्फ पुष्पा मोहम्मद इलीयास (वय १९, रा. गल्ली नं. ७, मिल्लतनगर, नांदेड) आणि दोन अल्पवयीन बालके अशी आहेत.

वाहनाच्या कागदपत्रांबाबत विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. विश्वासात घेऊन सखोल चौकशी केली असता त्यांनी नांदेड, परभणी आणि वसमत (जि. हिंगोली) येथून दुचाकी व मोबाईल चोरी केल्याची कबुली दिली. इतर चोरीच्या मोटारसायकली बटाटा- कांदा मार्केटच्या पाठीमागील झुडपात लपवून ठेवल्याचे त्यांनी सांगितले. पोलिसांनी पंचासमक्ष तेथून मुद्देमाल जप्त केला.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com